# <u>औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद</u>

## <u>दिनांक १३.१०.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>

शुक्रवार  दिनांक १३ ऑक्टोबर २००६ रोजी मा.महापौर श्री. किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे दुपारी १.०० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली.  सभेला प्र.मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व  खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०८. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
०९. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१०. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
११. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१२. स.स.सौ.आशन्ना लक्ष्मी शंकर
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२५. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३१. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल

३३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३६. स.स.श्री.खान निसार मो.खान
३७. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३८. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
३९. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४०. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४२. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४३. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४४. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४५. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४६. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४७. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४८. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४९. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५१. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५२. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५३. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५४. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५६. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५७. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५८. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५९. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६०. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६१. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६२. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६३. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६४. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६५. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६६. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६७. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७३. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७४. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग

७५. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७६. स.स.श्री.बारवाल गजानन
७७. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
७८. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.अ.साजेद अ.सत्तार
श्री.सलीम खान : स.सदस्या नजमा कुरैशी यांचे पती पै.श्री.युनूस कुरैशी यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.जावेद कुरैशी : स.सदस्या नजमा कुरैशी यांचे पती श्री.युनूस कुरैशी यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले, त्यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री. दिलीप गायकवाड : भारतीय बहुजन समाज पार्टीचे नेते स्व.कांशीराम यांचेही दु: खद निधन झालेले आहे त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री. संतोष खेंडके : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : सर्वानी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी ०२ मिनिटे उभे रहावे.

याच वेळी सभागृहात पै.श्री.युनूस कूरैशी तसेच स्व.श्री.कांशीरामजी यांना सभागृहा तर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री. सिताराम सुरे : मागील १५ महिन्यापासून मी मयूरपार्क तसेच इतर काही सोसायटीमध्ये पाणी पुरवठ्याबाबत कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांना पत्रव्यवहार केलेला आहे. परंतू पाणी उपलब्ध नाही,पाणी देवू शकत नाही, म्हणून उत्तर दिले. या भागात नागरीकांनी १०० टक्के बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केलेले आहे तरी या भागात पाणी कसे देता येईल, याचा विचार करावी.

श्री. सलीम खॉन :मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केद्रांचे आपल्या हस्ते उद्घाटन झाल्याबध्दल अभिनंदन करतो. तसेच माजी विरोधी पक्ष नेता माझे बंधु श्री.अफसर खान यांचे सुध्दा अभिनंदन करतो.

श्री.मो.जावेद मो.इसाक : सभेची वेळ सकाळी ११.०० वाजता होती आता १.०० वाजलेला असून नमाजची वेळ असते व रमजानचा महिना देखील आहे. विनंती की १.०० ते ३.०० पर्यत सभा तहकूब करावी. त्यानंतर घेण्यात यावी.

श्री. संजय सिरसाट : याचा अर्थ स. सदस्यांचे असे मत आहे की विषय पत्रिका ताबडतोब घेवून सभा लवकर संपवावी.

श्री. बाबासाहेब डांगे : मुकूंदवाडी येथील झालेले अतिक्रमण मा.उच्च न्यायालयाचे आदेश असतांना काढण्यात आले नाही. मागिल बैठकीत या संदर्भात चर्चा होवून, पाहणी करून कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते परंतू अदयाप कार्यवाही केलेली नाही.

श्री. अ. साजेद अ.सत्तार: आता नमाजची वेळ आहे ३ वाजेपर्यत सभा तहकूब करावी.

श्री. सलीम खान : सभा तहकूब करून दुपारी ३.०० वाजता घेण्यात यावी.

श्री. संजय जगताप : तुर्त सभा तहकूब करण्यात यावी.

श्री. संतोष खेडके : विषयपत्रिका अगोदर घेवून १.३० वाजता नमाजासाठी तहकूब करावी.

श्री. नारायण कुचे : मुकूंदवाडी येथील झालेले अतिक्रमण पाडण्याचे मा. न्यायालयाचे सहा महिण्यापूर्वीच आदेश असतांना प्रशासकीय अधिकारी व नगररचना विभागाने

मार्कींग न केल्यामूळे पाडण्यात आले नाही. वारंवार मी पत्र दिलेले आहे. उशीर झाल्यास महानगरपालिकेवर कन्टेम ऑफ कोर्ट होवू शकते.

श्री. संजय जोशी : ४ घरे अतिक्रमीत,ती पूर्णपणे रस्त्याच्यामध्ये बांधकाम केलेले आहे. त्या संदर्भात मा.उच्च न्यायालयात महानगरपालिकेने याचिका दाखल केली होती. व सहा महिण्यापूर्वी मा. न्यायालयाने सदरचे अतिक्रमण काढून टाकण्यात यावे म्हणून आदेशीत केलेले आहे. परंतू अदयाप काढलेले नाही. याचा खूलासा करण्यात यावा.

मा. महापौर : संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

सहा. संचालक (न.र.) : सदरील जागेवर मी स्वत: पाहणी केली असून ती जागा सिडकोने संपादीत केलेली आहे. त्या जागेची हद्य सिडकोकडून निश्चित करून घ्यावी लागेल. महानगरपालिकेकडे त्या संदर्भात रेकॉर्ड नाही.मार्कींग करून १५ दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

श्री. नारायण कुचे :खाजच्या कोर्टात महापालिकेच्या बाजूने निकाल लागलेला होता. मा. उच्च न्यायालयातही तोच निकाल कायम ठेवला. या बांधकामाच्या तीन ही बाजूने रस्ता आहे.रस्त्याच्या बाजूचेच अतिक्रमण काढायचे आहे. अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतात.

मा. महापौर : १५ दिवसाच्या आत त्या जागेचे मार्कींग करून घेवून प्रशासकीय अधिकारी यांनी झालेले अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.

श्री. संजय जोशी : गेल्या १५ वर्षापासून जयविष्वभारती कॉलनीतील नागरीकांनी बेटरमेंन्ट डेव्हलपमेंन्ट चार्जेस भरणा केले. तेथे बांधकाम परवानगी दिली सर्व अधिकृत घरे झालेली असतांना व संबधीत अधिकारी यांना वेळोवेळी या संदर्भात कळविले असतांना अदयाप पाणी पूरवठयाची व्यवस्था केलेली नाही.पाणी देणार आहे की नाही खूलासा घेण्यात यावा.

श्री.शंशांक विसपूते : माझ्या वार्डात दोनवसाहती गेल्या १५ वर्षापासून अधिकृत असून अद्याप पाणीपूरवठा केलेला नाही.

श्री. प्रल्हाद निमगांवकर : माझ्या वार्डात अनेक अधिकृत गृह निर्माण संस्था आहे तसेच देशमूख नगर हा अधिकृत भाग असून तेथे पाणीच दिले नाही. तीन वर्षापासून मी हा प्रश्न मांडतो आहे, २ वेळा टेंडर काढले असतांना अद्याप काम सुरू नाही.

शहर अभियंता : दिवाळी ईद नंतर शट डाऊन घेणार आहोत. यामूळे ७ ते ८ एमएलडी पाणी वाढणार आहे. ज्या ज्या भागात जसे आताच स. सदस्यांनी सूचना केल्या प्रमाणे जय विश्वभारती व इतर भागात पाणी देण्याचा प्रयत्न करू.

मा. महापौर : फारोळा येथे ४०० चे दोन पंप बसवलेले आहे. दोन दिवस शटडाऊन करायचे होते. त्यामूळे ८ ते १० एमएलडी पाणी वाढणार आहे. आता ते दिवाळी ईद नंतर शट डाऊन करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ५-६ एमएलडी पाणी वाढेल.

श्री. संजय जोशी : येत्या १४,१५ तारखेला शटडाऊन घेणार आहे असे वृत्तपत्रात आले.

शहर अभियंता : तो शटडाऊन पूंडलिकनगर भागात पाणी देण्यासाठी घेणार आहेत.

याच वेळी मा.महापौर डायस समोर अनेक सदस्य एकत्र येतात व नमाजची वेळ असल्यामूळे सभा तहकूब करून ३ वाजता आयोजीत करावी अशी मागणी करतात. काहीही ऐकू येत नाही.

श्री. सय्यद खुसरो : अनेक विषयावर चर्चा करावयाची आहे. तुर्त सभा तहकूब करावी. नमाजची वेळ आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : विकासात्मक काम करावयाचे असेल व स. सदस्यांच्या भावना लक्षात घेवून अर्धा तासासाठी सभा तहकूब करावी.

श्री. संजय सिरसाट : नमाजची वेळ झालेली आहे सभा तहकूब करण्या बाबत सदस्यांनी मागणी केलेली असून ती मान्य करून सभा काही वेळासाठी तहकूब करावी.

मा. महापौर : १ तासासाठी सभा तहकूब करण्यात येते.(सभा दुपारी १.१० वाजता तहकूब पून्हा सभा दुपारी. ३.३५वाजता सूरू.)

सौ.मोमीन सफिया फिरदोस : आपण मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे काम पूर्णत्वा कडे नेले व आपल्या कारकिर्दीत ते सूरू करण्यात आले. त्याबध्दल आपले सर्व नागरीकांच्या वतीने अभिनंदन करते.

श्री. संजय जगताप : उपआयुक्त(म)श्री.आनंदकर हे या सभागृहात नाही त्याची बदली झालेली आहे काय खूलासा घेण्यात यावा.

उपआयुक्त (प्र.) : उपआयुक्त (म) श्री.आनंदकर हे शासनाच्या महिला व बाल विकास समितीच्या कालच्या महत्वाच्या बैठकीसाठी गेलेले आहे. ते उद्या ते कार्यालयात रूजू होती. त्यांचे बदली बाबत शासनाचे आदेश प्राप्त झालेले आहे मा.आयुक्ताकडे आदेशाची प्रत असून त्यांचे स्तरावर कार्यमुक्त करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : मा.आयुक्त सुध्दा उपस्थित नाही प्रशासनाकडून खूलासा घेण्यात यावा.

उपआयुक्त, (प्र.) : मा.आयुक्त श्री.गुप्ता हे जपानला एका महत्वाच्या प्रशिक्षणासाठी गेलेले आहे. या कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार मा.अतिरिक्त विभागीय आयुक्त श्री.माधव सांगळे यांचेकडे दिलेला आहे. परंतु ते आज डीपीडीसीच्या बैठकीला गेले असल्यामूळे ते उपस्थित नाही.त्याचें आदेशानूसार आजच्या सभेचे प्र.आयुक्त म्हणून मी काम करीत आहे.

श्री. सय्यद खुसरो : शहरात मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे.त्या बाबतीत प्रशासन कार्यवाही करीत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री.आनंदकर यांचा विषय संपवावा.त्यांची बदली झाली आहे,त्यांना कार्यमुक्त केले का?

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : या शहराचे अनेक प्रश्न आहेत ते आपण चर्चेला घेत नाही. माझ्या वार्डात किती खूल्या जागा आहे या बध्दल माहिती विचारलेली होती. आपणा सर्वांना नागरीकांनी निवडून दिले. बजेटनूसार या शहरातील विकास कामे झालेली आहे काय?अधिकाऱ्याच्या बदल्या करून कामे होणार नाही. गेल्या दीड वर्षात कोणती कामे झालेली आहे. मागिल वर्षीच्या अंदाजपत्रकातील स्पील ओव्हरची कामे सूध्दा झालेली नाही. माझ्या वार्डात पाणीपूरवठयाचे तसेच १५.०० लक्षचे ड्रेनेजचे काम बजेट मध्ये तरतूद असतांना होत नाही.शातींपूरा भागात नेहमी पावसाचे पाणी लोकांच्या घरात घुसते. तीनही मुद्याचा खुलासा करावा.

श्री. सय्यद खुसरो : माझ्या वार्डात महापालिकेची खुली जागा आहे. मा.आयुक्तांनी पाहणी केली आहे व प्रशासकीय अधिकारी तसेच मालमत्ता अधिकारी श्री.कालेले यांना सूचना केल्या, परंतू कार्यवाही केली जात नाही.

मा. महापौर : मागिल बैठकीत नाल्याच्या अतिक्रमण संदर्भात चर्चा झालेली होती निर्णयही दिलेला होता. मा. आयुक्त यांनी ५ ऑक्टोबरच्या नंतर नाल्या काठचे अतिक्रमण काढण्याचे आश्वासन दिलेले होते. आतापर्यंत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. माहिती दयावी.

प्रशासकीय अधिकारी : नाल्याकाठचे व नदी पात्रात असलेल्या अतिक्रमण धारकांना एकूण ९० लोकांना नोटीसा दिलेल्या आहे.नोटीसची मुदत संपल्यानंतर पूढील कार्यवाही करण्यात येईल.

मा. महापौर : मागिल बैठकीत शहर अभियंता यांनी १३८५ अतिक्रमण आहे असे म्हटले होते. त्यापैकी फक्त ९० घरांनाच नोटीसा दिल्या काय ?

प्रशासकीय अधिकारी : नदी पात्रात बाधीत असलेल्या ९० घरांना नोटीसेस दिलेल्या आहे. नोटीस देवून आठ दिवस झाले. १५ दिवसाची मुदत आहे. त्यानंतर पूढील कार्यवाही होईल.

श्री. सय्यद खुसरो : नोटीसची प्रत सभागृहात दाखवावी. कोणत्या भागातील लोकांना नोटीसेस दिलेल्या आहे.

श्री. संजय जोशी : दरवर्षी पावसाळयापूर्वी नाल्या काठची घरे काढून घेण्यात यावी म्हणून प्रशासन वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देते. व नुकसान झाले तर महापालिका जबाबदार नाही असेही नमूद केलेले असते. असे असतांना पुन्हा नोटीस कशासाठी देतो. न्यायालयात जाण्यासाठी नोटीस देण्यांत येते का?

श्री. सय्यद खुसरो : आपण माझ्या वार्डात पाहणी केली होती. नाल्यात असलेली भिंत तोडण्याचे आदेशीत केले होते त्या नागरीकांना नोटीसा दिल्या अतिक्रमण झालेले काढले नाही.

श्रीमती मेहरून्नीसा खान : वार्ड क्र २८ मध्ये ८० फुट रूंद डी. पी रस्ता असून या रस्त्याच्या बाजूला लोकांनी ४० फुटापर्यत अनधिकृत बांधकाम केलेले आहे. या संदर्भात मी संबधीत अधिकारी यांचेकडे ४ ते ५ वेळा पत्र दिले. अद्याप कार्यवाही केलेली नाही.

श्री. संजय जोशी : सभा तहकूब करून नाला पाहणीसाठी आपण गेलेलो होतो. झालेल्या अतिक्रमणा बाबत कार्यवाही तर केलीच नाही परंतू सभागृहात उत्तर देण्यास तयार नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : १ एप्रिल २००५ ते आतापर्यत फक्त ५३२ घरांनाच बांधकाम परवानगी दिलेली आहे. यानूसार शहरात एवढेच बांधकाम चालू आहे काय?

उपआयुक्त (प्र) : प्रशासकीय विभागाकडून अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना १५ दिवसाच्या मुदतीची नोटीसेस दिलेल्या आहे. तो कालावधी संपल्यानंतर दिपावली व रमजान ईद झाल्यानंतर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री. सय्यद खुसरो : माझ्या व मा.महापौरांच्या वार्डात महानगरपालिकेची मोठी खूली जागा असून त्याच्या सुरक्षिततेसाठी काय उपाय योजना करण्यात आलेली आहे. १००'×१५०' जागा आहे. अतिक्रमण होत आहे. काय कार्यवाही केली.

मा.महापौर : कुंपन करण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत.

श्री.काशिनाथ कोकाटे : महानगरपालिकेचे परिक्षेत्र ७ कि.मी.आहे. शहरातील रस्ते खड्डयात की खड्डा रस्त्यात अशी परीस्थिती दिसून येते. कार्यकारी अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता यांच्या माध्यमातून रस्ते दुरूस्तीच्या ज्या कामाच्या निविदा काढलेल्या आहेत वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत ती कामे होणे गरजेचे होते. आर्थिक स्त्रोत औद्योगिक वसाहतीतून आहे. महानगरपालिकेला ४०/४२ कोटी जवळपास औद्योगिक वसाहतीतून मिळते. मास्को कंपनी पासून ते ब्रांडी कंपनीपर्यत तसेच पूढे धूत हॉस्पीटल पर्यत त्याच प्रमाणे वखार्ड कंपनीपासून ते नारेगाव व देवगिरी टेक्सटाईल पासून वखार्ड पर्यत या संपूर्ण रस्त्याची दुरावस्था झालेली असून वाहन चालविणे कठीण झाले आहे. सिडको हस्तांतरण होवून सहा महिणे झाले . १५ कोटीमधून सिडको भागासाठी काम करणार होते. तसेच जकातीतील ४२ कोटीची रक्कम मिळूनही विकास कामाकडे दुर्लक्ष आहे. प्रशासनातील अधिकारी काय काम करतात असा प्रश्न निर्माण होतो. ठराविक ८ ते १० वार्डात कामे केली जातात निराला बाजार परीसराच्या भोवताली प्रशासन फिरत आहे. ठराविक रस्त्याचीच डागडुजी होत आहे. एकदा काम केल्यानंतर किमान तीन ते पाच वर्ष काम करण्याची गरज नाही. दुभाजकाच्या नावाखाली मोठी रक्कम खर्च केली जात

आहे. पुन्हा पुन्हा त्याच त्या ठिकाणी कामे होत असेल व महानगरपालिकेचा निधी वाया जात असेल तर गैर आहे. रस्ते दुरूस्तीच्या कामाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. जर कुणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असेल तर त्यांचेवर कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. कोणते व किती कामे प्रोसेस मध्ये आहे याची माहिती सभागृहात देणे आवशक आहे. १७ महिने झाले कामे झालेली नाही. रेल्वेस्टेशन ते इंजिनिअरींग कॉलेज पर्यतच्या रस्त्याची निविदा काढलेली होती २३ महिण्याचा कालावधी गेला काम झाले नाही.कामाची निविदा काढण्यासाठी एक वर्ष व काम पूर्ण होण्यास जर तीन वर्ष लागत असतील तर योग्य नाही. नगरसेवकांना अधिकाऱ्याच्या मागे फिरावे लागते सचिंका अधिकाऱ्यापर्यत दयाव्या लागतात यासारखे दुर्दैव नाही. कोणते रस्ते खराब आहे. व किती रस्त्याची कामे झालेली आहे याची माहिती घेण्यात यावी.

श्री. संतोष खेडंके : संपूर्ण शहरातीलच रस्ते खराब झाले असून अधिकारी सांगतात पावसामूळे खराब झाले. आहे. परंतू केलेले कामच निष्कृष्ठ दर्जाचे आहे. जी रस्त्याची कामे झाली त्याची सीबीआय मार्फत चौकशी करावी.

श्री.दिलीप गायकवाड :देवगिरी कॉलेज तसेच बजाज हॉस्पीटल यांचेकडून मागिल दोन वर्षात किती कर वसूल करण्यात आलेला आहे.

श्री. सलीम खान : गणपती उत्सव दसरा पूर्वी पॅचवर्क झालले रस्ते खराब झाले. रस्त्यामध्ये मोठे खड्डे झालेले आहे.

श्री. अनिल जैस्वाल : हर्सूल टी.पॉईन्ट ते सिडको बसस्टॅण्डचा पॅरलल रस्ता खराब झालेला आहे. तीन बैठकीपासून रस्ता दुरूस्तीसाठी मागणी करीत आहे कार्यवाही होत नाही.

मा. महापौर : अति. शहर अभियंता यांनी खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : एमआयडीसी भागातील रस्त्यासाठी सन ०६-०७ च्या अर्थसंकल्पात ५० लक्षची तरतूद ठेवलेली आहे. या कामाचे अंदाजपत्रक तसेच काही कामाच्या निविदा काढण्याच्या प्रोसेस मध्ये आहे. चिकलठाणा एमआयडीसी हा परीसर मोठा आहे. सर्वच रस्त्याची कामे एकाच वर्षात करता येणार नाही तरतूद कमी पडते. त्यामूळे दरवर्षी टप्प्या टप्प्याने रस्त्याची कामे करावी लागणार आहे. १० वर्षापासून एमआयडीसी परीसर महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेला आहे. तेंव्हा पासून या रस्त्याची डागडुजी केलेली नाही. जे रस्ते खूपच खराब आहेत ते टप्प्या टप्प्याने घेत आहोत. स. सदस्यांनी म्हटल्या प्रमाणे खरोखरच या रस्त्याची दुरावस्था झालेली आहे.या वषीही काही रस्ते घेतलेले आहे. या भागातील काही कामाचे टेंडर प्रोसेसला आहे. पावसाळा संपलेला असून यापूढे ही कामे केली जातील.

श्री. काशिनाथ कोकाटे : १० वर्ष हस्तांतरण होवून झाले आता ही बाब अधिकाऱ्याच्या निदर्शनास आलेली आहे. या वर्षात ५० लक्षची तरतूद या रस्त्यासाठी असून हे आर्थिक वर्षातील सहा महिन्याचा कालावधी गेला अदयाप डांबरीकरणाचे काम केलेले नाही. अनेक रस्त्यात तीन ते चार फुटाचे खड्डे पडलेले आहे. ४२ कोटी जकातीचे उत्पन्न आले. कामे केली नाही तसेच उस्मानपूरा इंजिनिअरीग कॉलेज ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचे निविदा अंतिम होवून २३ महिने झाले अदयाप काम झालेले नाही.

अति. शहर अभियंता : या रस्त्याचे काम जवळ जवळ पूर्ण झालेले आहे. रेल्वेस्टेशनची जागा ताब्यात मिळालेली नाही.रेल्वेस्टेशन ते वेदांत हॉटेल पर्यत अर्धा कि.मी.चे काम बाकी आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : सर्वच बाबी नगरसेवकांनी अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देणे हे बरोबर वाटत नाही. अधिकारी यांना सर्व सूविधा उपलब्ध करून देवून सूध्दा काम करीत

नसतील तर कशासाठी सुविधा दयायच्या असा प्रश्न निर्माण होतो.देण्यात येणाऱ्या सुविधा योग्य प्रकारे वापर होतो किंवा नाही हे सूध्दा बघणे गरजेचे आहे.तुम्हा आम्हा सर्व नागरीकांना मालकत्ता कर भरावा लागतो. आणि त्या जनतेला पाणी रस्ता देवू शकत नसेल तर याला अर्थ नाही. आपण निर्णय घेतो परंतू त्याची अमलबजावणी होत नाही. जे अधिकारी निर्यणाची अमलबाजवणी करीत नसतील तर तसे शासनाकडे पाठवावे. शासनास दाद मागता येईल. तरतूद असतांना कामे केली जात नाही. ३.५० कोटी रूपये शासनाने रस्त्याच्या कामासाठी दिले. पुण्याला मुळा मुठा नदीचे प्राधिकरण होते तर येथे खामनदीला का होवू शकत नाही. त्यासाठी का बजेट मागवू नये. याचा विचार प्रशासनाने केला आहे काय. असे केले नाही तर विकास होणार कसा. म्हणून निष्काळजी केल्याबध्दल शिक्षा झाली पाहिजे त्याशिवाय अधिकारी कामे करणार नाही. येथील महानगरपालिकेला पदाधिकारी व नगरसेवकांना बदनाम करण्याचा कट करित आहे. असे माझे स्पष्ट मत आहे. काम करण्यास सूध्दा ३,६,८,१० महिने एक वर्ष लिमीट दिलेले असते या कालावधीत कोणत्या प्रकारचे काम झालेले दिसून येत नाही हे आपल्या निदर्शनास आणून देतो.माझ्या वार्डात एकही कामास सूरूवात केलेली नाही. सभागृहात नुसती चर्चा होते कार्यवाही होत नाही. जर कार्यवाही होत नसेल लोकशाही मार्गाने कार्यवाही करण्याचा आम्हाला अधिकार आहे. तातडीने विकास कामे होण्यासाठी मार्ग काढावा.

श्री. हिम्मतराव दाभाडे : गेल्या दोन वर्षापासून पीरबाजार व एकनाथनगर डी. पी जवळ अतिक्रमण झाल्या बाबत सूचना करतो परंतू प्रशासकीय अधिकारी श्री.निकम यांनी अदयाप कार्यवाही केली नाही.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : विकास कामे होत नाही यावर गंभीर विचार करण्याची वेळ आलेली आहे.आपल्या कार्यकाळात जे जे निर्णय घेतले त्याची अवलोकन करण्याची वेळ आलेली आहे. जे जे लोकहिताचे निर्णय वर्षभरात घेतले त्याची अमलबजावणी झाली किंवा काय याची माहिती घेण्यात यावी. सिडको हडको भागात रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. इतर ठिकाणी एवढी नाही. गेल्या वर्षभरात माझ्या वार्डात रस्त्याचे एकही काम झालेले नाही. रस्त्यासाठी मापदंड आहे जे की लेप , डांबर , खडी किती टाकली पाहिजे. एका रस्त्यासाठी ६ ते ८ महिणे घेतात. शहरातील मुख्य रस्त्यावर खड्डे पडलेले आहे पॅचवर्क का केले जात नाही. जे ठराव आपण मंजूर करतो त्याची अमबजावणी होत नाही. ज्यात हितसंबंध आहे, त्यावरच कार्यवाही होते. वर्षभरात जे ठराव झाले, त्यावर काय कार्यवाही झाली. याची माहिती पूढील बैठकीत देण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कोणत्या भागातील रस्ते करण्यात आले सहा पत्र दिले अदयाप एका ही पत्राचे उत्तर प्रशासनाने दिलेले नाही.

मा.महापौर : स.सदस्यांनी पत्र दिल्यानंतर विभाग प्रमुखांनी त्याचे चार ते पाच दिवसात उत्तर देणे आवश्यक आहे. यापूढे स. सदस्यांनी पत्र दिल्यानंतर संबधीत जे अधिकारी असतील त्यांनी ७ दिवसाच्या आत उत्तर देण्यात यावे.

सौ.दिपाली पाटील : मागिल तीन महिण्यापूर्वी एमआयडीसी चिकलठाणा भागात रस्ते खराब झाले. आजही त्या रस्त्यावर खड्डे पडलेले आहे. या संदर्भात मी पत्र दिले अदयाप कार्यवाही केली नाही. पॅचवर्कचे काम करण्याचे आदेश करावे. एक वर्ष झाले अदयाप त्या ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही त्यांना काळया यादीस समावेश करावा.

श्री. संतोष खेंडके : वारंवार स. सदस्य बैठकीत प्रश्न मांडतात. प्रशासन त्याबाबतीत कार्यवाही करीत नाही. याची दखल घेण्याचे आदेशीत करावे.

श्री. अनिल जैस्वाल : सिडको बसस्टॅण्ड ते हर्सूल टि पॉईन्ट पर्यत पॅरलल रस्त्याचे काम का करण्यात आलेले नाही. या रस्त्यावर अनेक वेळा अपघात होत आहे या रस्त्याचे काम तात्काळ हाती घेण्यात यावे. मागिल ३ सभांपासून हा मुद्दा मी मांडत आहे.

अति.शहर अभियंता : सिडको एमआयडीसी रस्त्याची कामे करण्या संदर्भात निविदा प्रोसेस मध्ये असून आता पावसाळा संपलेला आहे. दिपावली झाल्यानंतर पूढील महिण्यापासून रस्त्याची कामे सूरू होतील. तसेच शहर आणि सिडको भागातील इतर रस्त्याचे पॅचवर्कचे कामही करण्यात येईल.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : शहरातील जे मुख्य रस्ते आहे त्यावर पॅचवर्कचे काम करण्यात यावे. दिवाळी चांगली होईल.

अति. शहर अभियंता : या आठवडयात मूख्य रस्त्यावरील पॅचवर्कचे काम करण्यात येईल.

मा. महापौर : दिपावली पूर्वी मुख्य रस्त्यावरील पॅचवर्कचे काम करण्यात यावे अशा सूचना संबधीत अधिकारी यांना देण्यात येत आहे.

डॉ. भागवत कराड : पॅचवर्कचे काम चांगल्या प्रतीचे झाले पाहिजे. याची दखल घेण्यात यावी.

श्री. अनिल जैस्वाल : माझ्या वार्डातील कामासाठी ८.५० लक्ष तरतूद असतांना अदयाप अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

मा. महापौर : संबधित अधिकारी यांनी तीन दिवसात अंदाजपत्रक तयार करावे.

सौ.रजनी जोशी : सिडको हस्तातंरण होवून ६ महिने झाले कोणतेही विकास कामे झालेली नाही. मोठया प्रमाणात रस्ते खराब झालेले आहे. आपण स्वत: रस्त्याची पाहणी करावी पॅचवर्कचे काम त्वरीत करण्यात यावे.

मा. महापौर : सिडकोसाठी जे १५ कोटी ठेवलेले आहे त्यातून रस्त्याची कामे करावी तसेच शहरातील व इतर ठिकाणचे मुख्य रस्त्यावरील पॅचवर्कचे काम आठ दिवसात करण्यात यावे.

सौ.मेहरून्निसा खान : ८० फुट रोडवर अतिक्रमणा संबंधात श्री.निकम यांचेकडे ४ तक्रारी दिल्या. या रस्त्यावर लोक बांधकाम करीत आहेत. ८० फुटापैकी ४० फुटावर बांधकाम होत आहे.

श्री. नासेर नाहदी : पहिल्याच पावसात रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले नवीन रस्ते किंवा त्यावर पॅचवर्कचे काम केले नाही. कोणत्याही कामाचे अंदाजपत्रक,एजन्सी निश्चित झाली नाही. सहा महिने गेले कार्यवाही होत आहे अशीच उत्तरे प्रशासनाकडून आलेले आहे.अनेक ठिकाणी पाणी साचलेले आहे. रमजान,दिवाळीचे दिवस आहेत.

श्री. कोकाटे काशिनाथ : ज्या ठेकेदारानी रस्त्याचे काम केले होते तेच रस्ते मुदतीच्या आत खराब झालेले आहे. अशी कामे त्याच ठेकेदाराकडून करून घ्यावी. चौकशी करावी.

श्री. सलीम खान : खाम नदीला पूर आला ड्रेनेज लाईन तुटली. ते काम कधी करणार. या भागात बीबीका मकबरा आहे, तेथे पर्यटक येतात. त्या भागात दुर्गंधी येते. या सभागृहात ३-३ कोटीचे प्रस्ताव येतात ही कामे केली जाते परंतु २५ ते ३० लक्षचे ड्रेनेजची नागरीकाच्या आरोग्याला धोका होवू शकतो ती कामे केली जात नाही. त्वरित काम हाती घेण्यात यावे.

कार्य.अभियंता (विद्यु.ड्रेने.): या ठिकाणी सर्वेचे काम चालू आहे. ते काम मोठे असून दोन तीन दिवसात अंदाजपत्रक तयार करून काम करण्यात येईल.

मा. महापौर : आताच स. सदस्य श्री. सलीम खान यांनी केलेल्या सूचनेनूसार त्या ठिकाणचे अदांजपत्रक तात्काळ तयार करून पूढील कार्यवाही करावी.

सौ. कला बोरामणीकर : समर्थनगर भागात एका दुकान दाराने रस्ता सोडून ड्रेनेज लाईन टाकली. तो रस्ता दुरूस्त झालेला नाही. वारंवार तेथे अपघात होत आहे. दिपावलीच्या अगोदर तो रस्ता दुरूस्त करून घेण्याचे आदेशीत करावे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : शहरात डेंग्यूची साथ येत आहे. यासाठी आरोग्य विभागाकडून काय उपाययोजना करण्यात येत आहे . डेंग्यूमूळे घाटी दवाखान्यात एका व्यक्तीचा मृत्यूही झालेला आहे. वार्डात फवारणी होत नाही.

प्र.मा.आयुक्त : डेंग्यू या रोगावर नियत्रंण राहण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती काळजी घेतलेली असून प्रत्येक वार्ड निहाय पथक निर्माण केलेले असून पथकावर नियत्रंन ठेवण्यासाठी वरीष्ठ अधिकारी नियुक्त केलेले आहे. प्रत्येक पथकांचा अहवाल दररोज घेणार आहोत. योग्य ती काळजी घेत आहोत.

श्री. मोहन मेघावाले : माझ्या वार्डात दोन महिण्यानंतर एक फोगींग मशीन घेवून कर्मचारी आले एका कॉलनीत फवारणी करीत असतांना बंद पडले. पूर्ण भागात फवारणी न करता कागदावर काम केल्याचे दाखवित असेल.

श्री.बन्सीलाल गांगवे : सिडको हडको भागात स्वच्छतेचा ठेका दिल्यामूळे वार्डात फवारणी होत नाही. तसेच कचरा उचलल्या जात नाही कचरा उचलल्या नंतर त्या जागेवर किटकनाशक पावडर असते ते टाकले जात नाही.

सौ. रजनी जोशी : स्वच्छतेच्या बाबतीत विशेष सभा बोलवावी. त्या सभेत आरोग्या विषयी चर्चा करावी.

श्री. संतोष खेंडके : स्वच्छतेच्या बाबतीत तसेच औषध फवारणी करण्या बाबत अनेक वेळा नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. सिडको हडकोच्या भागातील अनेक लोकांच्या तक्रारी आलेल्या आहे खाजगी दिलेला ठेका रद्य करावा महानगरपालिकेचे कर्मचाऱ्यांकडून साफसफाई करावी.

श्री. अनिल जैस्वाल : सिडको हडको भागात स्वच्छता होत नाही. महापालिकेपेक्षा सिडको प्रशासन चांगले होते असे नागरीकांमध्ये चर्चा आहे.अशा वेळी नगरसेवक काय उत्तर देणार. सिडको हडको स्वच्छता होते की नाही या संदर्भात एक महिण्यात एकदाही अधिकारी यांनी पाहणी केली नाही. चिकुन गुनिया पेक्षा डेंग्यू हा भयानक रोग आहे.व्यक्ती दगावतो. ठेका रद्य करून महानगरपालिकेने साफसफाई करावी.

श्री. प्रशांत देसरडा : चिकुन गुनिया गेला आणि आता डेंग्यूची साथ आलेली आहे. तो होवू नये म्हणून चांगल्या प्रकारे फवारणी व स्वच्छता होत असून नियत्रन म्हणून वार्ड अधिकारी यांची नियुक्ती ही केलेली आहे असा प्रशासनाने खुलासा केला.माझा अर्धा वार्ड सिडको व अर्धा वार्ड शहरामध्ये येतो. मलेरिया विभागाचे काम आरोग्य विभागाच्या अंतर्गत चालते. आरोग्य विभागात सक्षम अधिकारी कोणीही नाही. आताच प्रशासनाने खुलासा केला पथक तयार करून वरीष्ठ अधिकारी नियुक्त केले. सर्व अधिकारी सभागृहात आहे. त्यांना नेमले म्हणून त्यांना तरी माहित आहे का? माझ्या वार्डात श्री.चावरे यांचे मुलाचा डेंग्यूच्या आजाराने निधन झाले असे संबधीत डॉक्टरानी जाहीर केले. परंतू सदर ठिकाणी मलेरिया विभागाचे किंवा आरोग्य विभागाचे कुणीही अधिकारी आलेले नाही. ज्या फवारणी मशीन मध्ये पुरेसे पेट्रोल नसते. त्यामूळे अर्धवट फवारणी होते. आतापर्यत शहरात चिकुन गुनियाचे व डेंग्युचे किती डास सापडले तसेच अनेक कर्मचारी हे फवारणी करतांना नागरीकाकडून पैशाची मागणी करतात. घ्या पण काम करा.

प्र.आयुक्त : वेगवेगळया ६ जे वार्ड कार्यालय आहे तेथील वार्ड अधिकारी यांचे नियत्रंन खाली पथक तयार केलेले असून अमलबजावणी होत आहे.

डॉ. भागवत कराड : कोणत्या वार्ड कार्यालयाकडे कोणते अधिकारी नियुक्त केलेले आहे शहरात डेंग्यूमूळे मृत्यू होत आहे. डासाचा नायनाट करण्यासाठी काय कार्यवाही होत आहे.

श्री. प्रशांत देसरडा : ज्या वरीष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती केली त्यानी कोणत्या वार्डात आतापर्यंत पाहणी केलेली आहे.

सौ. कला बोरामणीकर : कचरा उचलल्या नंतर त्या जागेवर औषध फवारणी होत नाही. कचरा हा सडलेला असतो. दुर्गंधी येते.तेथून डेंग्यूचा फैलाव होण्याची शक्यता आहे.

श्री.संजय रिडलॉन : माझा वार्ड स्लम घोषित असूनही वार्ड अधिकारी याचे नियत्रंना खाली जे ही पथक केले त्यांचेवर नियत्रंन बरोबर होत नाही. माझ्या वार्डात लाहोट नावाची महिलेला डेंग्यू झालेला आहे. या संदर्भात अधिकारी यांना कळविलेले आहे. तसेच अंगुरीबाग मोतीकारंजा भागातून नाला जातो. संरक्षित भिंतीचे काम होण्यासाठी वर्क ऑर्डर झालेली असतांना अद्याप कामास सूरूवात झालेली नाही. डासाची उत्पत्ती होवून त्यामूळे रोगराई निर्माण न होण्याच्या दृष्टीने नाला संरक्षित भिंत होणे गरजेचे आहे.

मा. महापौर : या बाबतीत संबधीत अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

श्री. कवरसिंग बैनाडे : हे शहर मोठे होत आहे. आरोग्याचा मोठा प्रश्न आहे. या वर्षी पाऊस ही जास्त झालेला आहे. एन -८ येथील उद्यानात सकाळी किमान ५०० नागरीक फिरण्यासाठी येतात. तेथे फवारणी होत नाही. संबधीत अधिकारी बोलवले असता आले नाही. आरोग्य विभागाचा कामकाज कोण पाहते.पूर्वी नाल्याच्या कडेला किंवा कचरा उचलल्यानंतर बी.एच.सी.पावडर टाकत होते. परंतू आता टाकतो की नाही. त्याचा साठा आपल्याकडे उपलब्ध आहे की नाही खूलासा करण्यात यावा.

श्री. महेश माळवतकर : फवारणी किती दिवसानंतर, केंव्हा केली पाहिजे. की अधिकाऱ्याना वाटेल तेंव्हाच करायची. असे काही टेंडरमध्ये दिलेले आहे का गेल्या दीड महिण्यापासून सिडको भागात औषध फवारणीची मशीन नेहमीच बंद असते. औषध फवारणी होत नाही.तरी बील अदा करणार काय ?संबधीत आरोग्य वैद्य.अधिकारी यांना कर्मचाऱ्याना निलंबीत करण्यासाठी वेळ असतो परंतू शहरात चिकुन गुनिया सारखी मोठी साथ आली होती आता डेंग्युची आलेली आहे. याकडे लक्ष देण्यास वेळ नाही. कोणत्या नगरसेवकांचा वार्ड येरीया किती आहे. व तेथे औषधाची फवारणी किती दिवसात केली पाहिजे.दोन दोन महिने औषध फवारणी होत नसेल तर नागरीकांचा रोष हा नगरसेवकांवरच असतो. यासंदर्भात काही नियम केले आहे का? आजपर्यंत काय कार्यवाही केलेली आहे याबाबतीत खुलासा घेण्यात यावा.

श्री. अनिल जैस्वाल :स्वच्छता होत नाही. डास निर्माण होतात यामूळे डेंग्यूची साथ मोठया प्रमाणात येवू शकते. पाण्याच्या पाईपला जेथे वाल आहे लिकिजेस आहे. ते बंद करून तिथे ढापे टाकावे. नसता आतून व बाहेरून कचरा मुळे डेंग्यूचे डास तयार होतील. याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री. संजय जोशी :संपूर्ण देशात डेंग्यूची साथ पसरल्याचे निदर्शनास येते. स. सदस्य श्री.देसरडा यांचे वार्डात एक बालकाचा डेंग्यूने मृत्यू झाला असे तेथील डॉक्टर लिहून देण्यास तयार आहे. असे असतांना संबधीत आरोग्य वैद्यकीय अधिकारी किंवा मलेरीयाचे कुणीही डॉक्टरानी तेथे जावून पाहणी केली नाही. सर्व आरोग्य केद्रांत डेंग्यूचे रूग्ण तपासणीसाठी अधिकारी नियुक्त करावयास पाहिजे होते. डेंग्यूचा डास चावल्यानंतर त्या व्यक्तीच्या जीवीतास धोका होवू शकतो. वैद्यकीय अधिकारी यांना गंभीरता कळाली नाही. महानगरपालिकेकडे एन-८ दवाखान्यात प्राथमिक

तपासणी होवून नंतरची तपासणीसाठी पुण्यास जावे लागते. विज्ञान अद्यावत झालेले आहे.खाजगी लॅब मध्ये रक्त तपासणीसाठी ४०० रूपये लागतात. एन-८ महापालिकेच्या दवाखान्यात व इतर ४ दवाखान्यात अंतिम तपासणीची व्यवस्थाही नाही. असे माझे मत आहे. आज आपण आदेशीत करावे व उदया पासून ठराविक दवाखान्यात डेंग्यू सदृष्य रोगाची रक्त तपासणी सुरू करावी.

श्री. मो.जावेद मो.इसहाक: चिकुन गुणीया ची साथ आली तेंव्हा प्रत्येक वार्डात कॅम्प लावण्यात आले होते. त्याप्रमाणे या रोगावर नियत्रंण होण्यासाठी कॅम्प लावण्यात यावे.

श्री. नासेर नाहदी : खामनदीला पूर आला होता. त्या पूराचे पाणी आजही वार्डात काही ठिकाणी साचलेले आहे. तेथे मोठया प्रमाणा डास झालेले असून आरोग्य वैद्य. अधिकारी यांना अनेक वेळा सूचना दिल्या की या ठिकाणी औषधी फवारणी करावी परंतू केली नाही. केंव्हा होणार आहे

श्री. मोहन मेघावाले : सलीम अली उद्यानात सकाळी १०० ते १५० नागरीक हास्ययोग शिबीरासाठी येतात. तेथील कारंजे बंद असून त्या पाण्याची दुर्गधी येते मोठया प्रमाणात डास , मच्छर झाले. लोकांना त्रास होतो. तसेच लाईटची व्यवस्था नसून उद्यानात मोठया प्रमाणात गवत झालेले आहे. तसेच तेथील वॉचमन हे नागरीकांना पैसे वसूल करतात दिले नाही तर त्रास देतात. हास्ययोगा च्या ठिकाणी घाण करून ठेवली जाते.

श्री. अनिल जैस्वाल : खूप चर्चा झाली आतापर्यत आरोग्य विषयी खूलासा झाला नाही. जर अधिकारी काम करण्यास तयार नसेल तर जे काम करू इच्छितात त्यांची आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर नियुक्ती करावी.

श्री. संजय जोशी : पूर्ण शहराच्या स्वच्छतेबाबत चर्चा करतो परंतू याच इमारतीमध्ये पदाधिकाऱ्याच्या दालनाशेजारी स्वच्छता गृहाची काय अवस्था आहे ते पहावे.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : स्वेच्छा निधीतून एक फोगींग मशीन मिळण्यासाठी तीन महिण्या पूर्वी पत्र दिले.वार्डात फवारणीसाठी कर्मचारी येतात. २० ते २५ नागरीकांच्या सहया घेवून ताबडतोब निघून जातात. योग्य ती संपूर्ण भागात फवारणी होत नाही त्यासाठी प्रत्येक नगरसवेकांच्या निधीतून एक फोगींग मशीन देण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खूलासा करावा.

प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी : डेंग्यू या रोगावर नियंत्रन करण्यासाठी एमपीडब्ल्यू यांचे मार्फत घरोघरी जावून ताप रूग्ण सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे ओपीडीमध्ये तापाचे रूग्ण आले असेल व ते पाच दिवस ताप असेल तर त्यांचेवर विशेष उपचार करण्यात येत आहे. अॅबेटची फवारणी व नागरीकामध्ये डेंग्यूच्या संदर्भात जणजाग्रण करण्यात येत आहे.

मा. महापौर : सिडको हडको भागात स्वच्छता व फवारणी होत नसेल तर संबधीत ठेकेदारास उदया माझ्या दालनात बोलवून घेवू मा. आयुक्तही राहतील. संबधीत ठेकेदाराशी चर्चा करून सूचना दिल्या जातील या भागात देखदेख करण्यासाठी आरोग्य विभागाने पथक तयार करावे कॅम्प लावून रूग्णाची तपासणी करता येईल का यासाठी नियोजन करावे डेंग्यूची साथ शहरात पसरानार नाही याची दखल घेण्यात यावी. वार्ड क्र १९ लगत असलेल्या स्मल भाग जाधववाडी व आंबेडकर नगर या भागात नवीन गटारचे काम चालू आहे.

याच वेळी मा.महापौर आपल्या जागेवरून उठतात व मा.उपमहापौर महापौराचे आसनगृहण करतात. (वेळ ५.१० वाजता)

श्री. प्रकाश अत्तरदे : मलाही एक फोगींग मशीन घेवून दयावे मीही फवारणी करून घेतो.

श्री. सय्यद खूसरो : उद्यानामध्ये कारंजाचे वाल चोरीला गेले. रू.१.०० लाख किमंतीचे आहे. त्या संदर्भात पोलीसात तक्रार दिलेली आहे का?

शहर अभियंता : सिध्दार्थ गार्डन येथे एक नोझल चोरीला गेले. त्यासंदर्भात अधिकारी यांना पोलीसात तक्रार करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : यापूर्वीही या उद्यानात चोरी झालेली होती. त्याचा गुन्हा दाखल केला होता का?

शहर अभियंता : केला होता.

श्री. सय्यद खुसरो : चोरीची तारीख माझेकडे आहे, अद्याप पोलीसात गुन्हा दाखल नाही. उद्यान अधिक्षक यांना निलंबीत करण्यात यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : यासंबधी गभींर दखल घेण्याचे आदेशीत करावे. चोरी झाली, तक्रार केली का? चोरी होते तेंव्हा वरीष्ठ अधिकाऱ्याना माहिती वेळोवेळी दिलेली आहे का व या व्यतिरिक्त अनेक ठिकाणी इतर साहित्य असेल ते चोरी गेलेले आहे का याची माहिती वरीष्ठाना आहे का? काही ठिकाणी पाईप लाईन चोरीला गेली आहे.

श्री. संजय रिडलॉन : वार्ड अधिकारी यांनी साफसफाई संदर्भात ठेकेदारांना दंड केलेला नाही. वार्ड ड कार्यालया अंतर्गत रात्रीच्या वेळी आम्ही सर्वे केला असता फक्त तीन सफाई मजूर काम करतांना आढळून येतात.काही कारणास्त्व कर्मचारी हजर नव्हते परंतू पाऊस झाल्यानंतर वार्डातील कचरा व स्वच्छता होत नाही. वार्ड ब कार्यालया अंतर्गत दोन कर्मचारी गैरहजर आढळून आले.

श्री. कवरसिंग बैनाडे : या सभागृहात महाराणा प्रताप यांचे तैलचित्र लावण्या बाबत मागणी होती. ते लावण्यात आलेला आहे. त्याबध्दल मा. महापौर व अधिकारी तसेच सभागृहाचे आभार मानतो.

श्री.सय्यद खुसरो : उद्यानातील चोरी प्रकरणात संबधीत अधिकारी यांचेकडून खूलासा घेवून आजची सभा तहकूब करावी नमाजची वेळ झालेली आहे सोमवारी सभा घेण्यात यावी.

याच वेळी मा. महापौर हे आसनगृहन करतात.

**विषय क्र. ४८९/१ :**

दिनांक १२.०९.२००६, १४.०९.२००६ (दि.१२.०९.०६ ची तहकूब),२०.०९.२००६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण / सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : दिनांक २५.९.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त का देण्यात आलेले नाही. अनेक विषय ऐनवेळचे घेण्यात आले.त्यात भुखंडाचे विषय आहे अशी बातमी दैनिक सकाळ मध्ये आलेली आहे असे कोणते विषय आहे याचा खूलासा घेण्यात यावा.तोपर्यत पूढील कामकाज घेवू नये.

मा. महापौर :आजच्या सभेला दिनांक १२,१४,२०-०९-२००६ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यासाठी आहे. दिनांक २५.९.०६ चे इतिवृत्त तयार नसल्याने देण्यात आलेले नाही. येत्या २७ तारखेला पून्हा सर्वसाधारण सभेचे आयोजन करणार आहोत. त्यावेळी २५.०९.२००६ चे इतिवृत्त दिले जाईल.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : ऐनवेळी कोणते विषय इतिवृत्तात टाकण्यात आले हे सदस्यांना माहित नाही.जे भुखंडाचे प्रस्ताव असतात ते आर्थिक देवाणघेणानचे असतात.

मा. महापौर : त्यावेळी जे ऐनवेळी शासकीय अशासकीय विषय असतील ते सर्व इतिवृत्तात येतील. वृत्तपत्रात ज्या इतिवृताच्या संदर्भात बातम्या आलेल्या आहे ते इतिवृत्त २७ तारखेच्या बैठकीत देण्यात येईल.ऐनवेळी नगरसेवकाकडून सुचक अनुमोदन म्हणून जे प्रस्ताव येतात तेच प्रस्ताव घेतले जातात. प्रशासकीय कार्यवाहीचे मा.आयुक्तांनाच अधिकार असतो, आयुक्तांना योग्य वाटत असेल तरच

शासनाकडे पाठविण्यात येते. परत येईल. ते मिनिटस् वेगळे आहे. विषय क्र १ मध्ये जे मिनिटस् दिले आहे त्यावर चर्चा करावी.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : आजच्या विषयपत्रिकेशिवाय कोणतेही रिझर्वेशन आणि रद्य केले असे विषय घेवू नये .

मा. महापौर :यापूढे आरोप होतील असे कोणतेही प्रस्ताव स. सदस्यांनी माझ्याकडे ऐनवेळचे म्हणून देवू नये.

डॉ. भागवत कराड : दिनांक २५.९.२००६ रोजी जे ऐनवेळचे विषय घेण्यात आले ते रद्य करावे. त्यास आमचा विरोध आहे. याची नोंद घ्यावी. जर कोर्ट मॅटर झाले तर आमचे सदस्य जबाबदार राहणार नाही.

मा. महापौर : विषय क्र १ मध्ये काय दुरूस्ती करायची ती करावी.

श्री. प्रशांत देसरडा :आजच्या दैनिक सकाळ वृत्तपत्रात पान क्र १ वर ऐनवेळच्या प्रस्तावात प्रस्ताव गुडांळून पाच भुखंडावरील आरक्षण रद्य अशी तीन कॉलमची बातमी आलेली आहे. या संदर्भात माजी सभापती श्री. कोकाटे यांनी आपल्याला पत्र दिले आहे. विषय क्र १ मध्ये २५.९.२००६ चे इतिवृत्त नाही परंतू ते का देण्यात आलेले नाही याचा खूलासा झालेला नाही. खबरदारीने हे प्रशासन चालते. प्रशासन व लोकप्रतिनिधी हे एका गाडीचे दोन चाके आहे. दीड वर्ष झाले आणखी आपल्याला बरेच दिवस बरोबर राहायचे आहे. त्यामूळे शंका घेण्याचे कारणच नाही. इतिवृत्त तयार करण्यास वेळ लागत असेल तर २५.०९.०६ च्या सभेच्या कॅसेट असतील त्या वाजवून दाखवाव्या.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दिनांक २५.९.२००६ चे इतिवृत्त विषय क्र १ मध्ये नाही त्यामूळे त्यावर चर्चा करणे योग्य नाही.

मा. महापौर : शासकीय अशासकीय प्रस्ताव आलेले होते ते दिनांक २५ तारखेच्या बैठकीत घेतलेले आहे. त्या सभेचे इतिवृत्त येत्या बैठकीला देण्यात येईल त्यावेळी चर्चा करावी.

श्री. देसरडा प्रशांत : सदर सभेचे इतिवृत्त प्रशासन का देवू शकले नाही याचा खूलासा कराावा.

मा. महापौर : २५ तारखेला सभा झाली. त्यानंतर आजची सभेची विषयपत्रिका ही पाच तारखेला काढलेली आहे. सचिव यांचेकडे प्रभाग समित्याचे सभांचेही काम आहे. त्यामूळे ते देवू शकले नसतील येत्या २७ तारखेला बैठक घेणार आहोत त्या बैठकीत २५.९.२००६ चे इतिवृत्त दिले जाईल.

डॉ.भागवत कराड : कोणते पाच ठराव भुखंडाचे त्या इतिवृत्ता घेतलेले आहे ही सत्य आहे का वृत्तपत्रात तसे आलेले आहे.

मा.महापौर : नगरसेवकांनी जे प्रस्ताव दिलेले होते ते व जे प्रशासकीय प्रस्ताव होते ते मंजूर केलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा : २५.९.२००६ च्या बैठकीत पाच भुंखडाचे प्रस्ताव आलेले आहे काय त्या सभेची कॅसेट व रजिस्टर आज सिल करावे अशी विनंती आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : मा. महापौरांना नियम लागू नसतील तरी प्रशासनाला नियम लागू आहे. जर लोकप्रतिनिधीनी वेळोवेळी पत्र दिल्यानंतर तीन ते चार दिवसानंतर किंवा जास्त मोठे व किचकट उत्तर असेल तर पाच ते सहा दिवसात देणे आवश्यक आहे. माहितीच्या अधिकारात सुध्दा सात दिवसात माहिती दिल्या जाते. संबधीत भूखंडाच्या बाबतीत मी आपणांला पत्र दिले आहे याची माहिती मला मिळालेली नाही. अशी माहिती मिळाली की भुखंड जे काही सुविधा केंद्र उपसुविधा केद्र जे शहरात ज्या जागेवर सोडण्यात आले आहे. त्याचे पत्र मी मा. आयुक्त तसेच मा.

महापौरांना पत्र दिलेले आहे. त्याचे उत्तर मला प्रशासनाकडून मिळणे अपेक्षीत होते.मला त्यांचे उत्तर मिळालेले नाही.

मा. महापौर : आपण दिलेले पत्र मी सहा.संचालक नगररचना यांचेकडे पाठविलेले आहे. त्या पत्राचे उत्तर आजच्या आज देण्यात यावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : उत्तर न देता ती संचिका मंजूर करण्यात आलेली आहे.पेट्रोल पंपाच्या बाजूला भुखंड होता.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :विषय क्र १ संदर्भाने जे मागिल इतिवृत्तात ऑदर्स ठराव घेतलेले आहे तो संदर्भ धरून ते आहेत. त्याची माहिती पाहिजे.

श्री. काशिनाथ कोकाटे :दिलेल्या पत्रात मान ठेवून संबधीत अधिकारी यांना उत्तर देण्याच्या स्पषट सूचना दिलेल्या होत्या. माहिती देण्याचे कर्तव्य होते माहिती दयायचीच नाही हा कुठला प्रकार आहे.

मा. महापौर : संबधीत अधिकारी यांचेकडून माहिती घेवू,तो विषय वेगळा आहे विषय क्र १ वर बोलावे.

डॉ. भागवत कराड : अशा प्रकारे चार भुखंड शहरात होते त्यातील एक कुठल्या बिल्डरला प्रशासनातर्फे या सभागृहाला माहिती न देता किंवा पदाधिकाऱ्याना किंवा स्थायी समितीला माहिती न देता परवानगी दिली असेल तर हे सभागृह सर्वोच्च सभागृह आहे दिलेली परवानगी रद्य करावी.जे काही काम चालू असेल त्या बाबतीत प्रस्ताव या सभागृहासमोर येवू दया चर्चा होवू दयावी. जेणे करून महानगरपालिकेचे व जनतेचे हित जोपासले जाईल.

मा.महापौर : विषय क्र १ च्या संदर्भात चर्चा करावी.

डॉ. भागवत कराड : विषय क्र १ च्या अनुशंगाने दिनांक २५.९.२००६ च्या बैठकीत जे काही ऐनवेळचे ठराव घेतले असतील त्यास आमचा विरोध आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जे ऑदर्स ठराव घेतले असतील त्यास आमचा पण विरोध राहणार आहे.

मा. महापौर : विषय क्र . १ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १२.०९.२००६, १४.०९.२००६ (दि.१२.०९.०६ ची तहकूब),२०.०९.२००६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण / सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**चर्चा :**

श्री. काशिनाथ कोकाटे : मी दिलेल्या पत्राचे उत्तर का देण्यात आलेले नाही.

सहा. संचालक (न.र.) : सभा संपल्यानंतर पत्राचे उत्तर देण्यात येईल.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : जो प्रश्न उपस्थित केला जे इतर यामध्ये मान्य झालेले आहे आणि अशा भूखंडाला परवानगी दिली आहे की नाही एवढाच खूलासा करावा.

सहा. संचालक (न.र.) : परवानगी देण्यात आलेली नाही.

डॉ. भागवत कराड : आताच खूलासा करण्यात आला की परवानगी दिलेली नाही. दिलेली नसेल तर अशा प्रकारचा भूखंड कोणता आहे जो सर्व सोयीसाठी महापालिकेने रिझर्वेशन केलेला आहे. अशा भूखंडाला पुढच्या दृष्टीने परवानगी देवू नये या सभागृहात त्याची चर्चा करावी तसे आदेश आपण दयावे.

मा. महापौर :प्रशासनाला जे अधिकार असतील ते रिझर्वेशनचे जे काही असतील ते माझ्या मते सभागृहाची मान्यता घेतल्याशिवाय परवानगी देता येत नाही. प्रशासनाला जे अधिकार आहे ते वापरतील सभागृहाकडे येण्याची गरज नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे :हे सभागृह सर्वोच्च आहे. धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार आहे.

मा. महापौर : आताच आपण जे म्हटले की परवानगी दिलेली आहे काय अधिकारी यांनी खूलासा केला की परवानगी दिलेली नाही.

**विषय क्र. ४९०/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्रमांक ८४ अंतर्गत विजय नगर (गारखेडा परीसर) भागात ड्रेनेज लाईनची सोय नाही. म्हणून या भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी सन २००५-२००६ च्या दरसूची नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अ.प.र.रू.८,९१,२५६/- होत आहे.

प्रस्तावित कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/ विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून प्रस्तावित आहे.

करिता अंदाजपत्रक र.रू.८,९१,२५६/- मंजूरीस्तव व हे काम उपरोक्त शासन निर्णयानुसार उपलब्ध झालेल्या तरतुदी मधून करून घेणेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक ८४ अंतर्गत विजय नगर (गारखेडा परीसर) भागात ड्रेनेज लाईन टाकणे र.रू.८,९१,२५६/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रस्तावित कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/ विधयो-१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४, मंत्रालय मुंबई -४०००३२ दिनांक ३१ मार्च २००६ च्या जोडपत्रावरील अ.क्र.१२४ वर औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपलब्ध झालेल्या र.रू.१६७.५८ लक्ष मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९१/३ :**

आयुक्त,महानगरपालिका, यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा क्र.१,२,३ येथे मा.पदाधिकारी व अधिकारी यांच्या दालनात व मनपा प्रशासकीय इमारत परिसरात आवश्यक कामे करणेस्तव मा.पदाधिकारी व अधिकारी यांची अग्रहाची मागणी असल्या कारणाने सदरील कामे करणेस्तव सन २००६-०७ या आर्थिक वर्षा अंतर्गत रक्कम रू.१५.०० लक्षची तरतूद होती तथापी सदरील तरतुद संपुष्टात आली असल्यामूळे मा.पदाधिकारी व अधिकारी यांच्या मागणीनुसार आवश्यक कामे करणे शक्य होत नाही व त्यामूळे संबंधीतांची होणारी गैरसोय लक्षात घेता सदरील कामासाठी १५.०० लक्षची तरतूद आवश्यक आहे.

करीता मनपा अर्थसंकल्प सन २००६-०७ पुस्तीका मधील पा.क्र.एम-४९ अ.क्र.१ (ब-२ अग्निशमन विभाग) अन्वये ठेवण्यात आलेली २.०० कोटी रूपयाची तरतूद या आर्थिक वर्षात पूर्णपणे खर्च होणार नसल्याने या तरतूदीमधून रक्कम रू.१५.०० लक्षची तरतुद सदरील कामास्तव वळती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. महेश माळवतकर :या प्रस्तावात असे म्हटले की तरतुद संपुष्टात आलेली आहे. १५ लक्ष कुठे खर्च केले. आणखी कोणती कामे करायची आहे. याचा खूलासा घेण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : १५ लक्ष प्रशासकीय इमारतीसाठी तरतूद होती. त्यात कोणती कामे झालेली आहे अशी माहिती मिळाली की कुठल्याही प्रकारची निविदा न काढता ही तरतूद खर्च करण्यात आलेली आहे. सत्य माहिती घेण्यात यावी.

मा. महापौर : या संबधीत प्रशासनाने संपूर्ण सविस्तर माहिती येत्या २७ तारखेच्या बैठकीत ठेवावी. २७ तारखेच्या बैठकीत हा प्रस्ताव घेण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव २७ ऑक्टोबर ०६ रोजी आयोजीत होणाऱ्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ४९२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील महत्वाच्या रस्त्यामध्ये असलेल्या चौकांचे सौंदर्यीकरण करणे या अंतर्गत चौकांच्या परिसरात कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याचे प्रस्तावित असून, ज्या ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्याचे प्रस्तावित आहे, ते चौक खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | चौकाचे नांव | अंदाजित खर्च रू. |
|---|---|---|
| ०१ | हॉटेल पंचवटी | ३१,१३,०००/- |
| ०२ | रेल्वेस्टेशन चौक | ३८,०७,०००/- |
| ०३ | पीरबाजार ते एकता चौक (भाजीवाई बाई पुतळा चौक) | १६,५४,०००/- |
| ०४ | गोपाल कॉर्नर ते उत्सव मंगल कार्यालय चौक ते वर्मा चौक करणे. | २७,५६,०००/- |
| ०५ | महाराणा प्रताप चौक | १९,६९,०००/- |
| ०६ | महावीर चौक | ६८,८८,६००/- |
| ०७ | सावरकर चौक समर्थनगर | १४,९२,८००/- |
| ०८ | टि.व्ही.सेंटर चौक | २१,१३,७५०/- |
| ०९ | चंपा चौक | १७,४०,४७५/- |
| १० | टाऊन हॉल चौक | ३५,०६,६७२/- |
| ११ | आझाद चौक | ४३,२९,०००/- |
| १२ | कलेक्टर ऑफिस चौक | २१,२७,५००/- |
| | **एकूण :-** | **३,५०,००,०००/-** |

उपरोक्त चौकात पेव्हर ब्लॉक बसवितांना चौकांचे मजबुतीकरण करण्याचे तसेच पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटार बांधण्याचे ही प्रस्तावित आहे.

तरी शहरातील विविध चौकात कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याचे रू.३,५०,००,०००/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सभा तहकूब करावी वेळ झालेला आहे. उर्वरीत विषय २७ तारखेच्या बैठकीत घेण्यात यावे.

डॉ. भागवत कराड : वेगवेगळया चौकात कॉक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी ३.५० कोटीची तरतूद ठेवलेली आहे. या कामाऐवजी शहरातील मुख्य रस्तेवर हा खर्च केला तर शहरातील नागरीक समाधानी राहतील. आज परीस्थिती अशी आहे की संपूर्ण शहरात रस्ते खराब झालेले असून खड्डयामध्ये रस्ता की रस्त्यामध्ये खड्डा हे कळायला मार्ग नाही. ३.५ कोटी मुख्य रस्त्यांच्या विकासासाठी वापरावे.

श्री. सलीम खॉन : तरतूद नाही म्हणून इतर विकास कामे होत नाही. ३.५० कोटीचे प्रस्ताव मंजूरीसाठी येतात हे करण्याची गरज नाही. मागिल सन २००५-०६ च्या बजेटमधील कामे झालेली नाही. हा प्रस्ताव रद्य करावा.

श्री. सय्यद खुसरो : रोजा सोडण्याची वेळ झालेली आहे सभा तहकूब करावी. उर्वरीत विषय नंतरच्या बैठकीत घेण्यात यावे.

डॉ. भागवत कराड : ज्या ज्या भागातील चौक नमूद केले त्या त्या भागातील मुख्य रस्तेचे काम यातून करण्यात यावे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : शहरातील विविध रस्त्यावर ही रक्कम खर्च करावी. कॉक्रीट पेव्हर ब्लॉक करण्याची गरज नाही. चौकापेक्षा जनतेला रस्ते चांगले करून द्यावे.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : कॉक्रीटचे करण्यात यावे पेव्हर ब्लॉक बसविण्याची गरज नाही.

श्री. संजय जोशी : कोणत्या हेड मधून हा खर्च करणार आहे खूलासा करावा.

श्री. सय्यद खूसरो : उद्यान मध्ये नोझल चोरीला गेले. त्याचा खूलासा झालेला नाही.

उद्यान अधिक्षक : विद्युत विभागाकडून कार्यवाही होत आहे. त्यांचे जवाब घेण्यात येत आहे. तपास चालू आहे. क्रांतीचौक पोलीस स्टेशनला प्रकरण असून फौजदार श्री.बाहेती यांनी जवाब घेतलेले आहे.

श्री.सय्यद खुसरो : पोलीस स्टेशनला तक्रार केलेली नाही.

मा. महापौर : स.सदस्यांना प्रत देण्यात यावी.

श्री. प्रशांत देसरडा : क्रांतिचौकात कॉक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले होते ते बरोबर ब सविले नाही तेथे जड वाहतूक असल्यामूळे लगेच निघाले लगेच ते नष्ट ही झाले.चौकाचे सुशोभिकरणासाठी किंवा क्रांतिचौक येथील शिवाजी महाराज पुतळयाची कॉस्टींग तेवढी होत नाही अशी तरतूद एका एका चौकासाठी या प्रस्तावात आलेली आहे. पेव्हर ब्लॉक्स वाटलं म्हणून केले. सुशोभिकरणास वाद नाही. चौकात कॉक्रीट पेव्हर ब्लॉक न बसविता सिमेटचे किंवा त्या चौकाचे मजबुतीकर करून डांबरीकरण करावे. जेणे करून हे काम ५० ते ६० लक्ष मध्ये होईल व उर्वरीत रक्कम रस्त्याच्या विकासाठी खर्च करण्यात यावे. जे अंदाजपत्रक तयार केले त्यासाठी इजिनियरिंग कॉलेजचा अभिप्राय घेतलेला आहे कोणते पेव्हर ब्लॉक लावणार आहात याचाही खूलासा करावा.

मा. महापौर : या बाबतीत खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : याकामासाठी जो निधी उपलब्ध झाला आहे यामध्ये शासकीय अर्थसहाय्य ३.५० कोटी आलेले होते.

श्री. खेंडके संतोष : रोड साठी निधी आलेला असेल तर कॉक्रीट पेव्हर ब्लॉक न बसविता शहरातील विविध रस्त्यावर हा खर्च करावा.

श्री. संजय सिरसाट : शासनाकडून रोड साठी एकूण २४ कोटीचा निधी आलेला आहे. यापूर्वी सर्वसाधारण सभेत रस्त्यावर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. रस्त्याचे तातडीने काम करावे म्हणून निर्णय घेतल्यानंतरही अमलबजावणी झालेली नाही. प्रत्येक वर्षी पावसाळयात रस्ते खराब होतात हे ग्रहीत धरत असाल तर एकदा रस्ता केल्यानंतर त्याची लाईफ तीन वर्ष असते. यापूर्वी या शहरातील मुख्य ९ रस्ते सिमेंटचे करणार होतो त्यास मान्यताही दिलेली आहे. शासनाकडून रस्त्यासाठी निधी आला .मा. आयुक्तांनी त्यांचे मर्जीनुसार डांबरीकरणाचे रस्ते घेतलेले आहे. ते डांबरीकरणाचे सर्वच रस्ते रद्य करून या शहरात कमीत कमी ८ ते ९ रस्ते सिमेंन्ट करावेत. मागे जे रस्त्याच्या बाबतीत टेंडर काढलेले आहे त्यात रिंग झालेली आहे.ते सर्व रद्य करून ती रक्कम यात ॲड करून सर्व रस्ते सिमेंट कॉक्रीटचे करावे ज्याची मुदत ६० वर्षाची असेल.

श्री. काशिनाथ कोकाटे : यापूर्वी ८ ते ९ रस्ते करण्याचा निर्णय या सभागृहाने घेतलेला होता. सभागृहाने निर्णय दिल्यानंतर अमलबजावणी होवू शकते की नाही. हेच फक्त प्रशासनाला पाहायचे होते. कोणती एजन्सी फिक्स करायची ते प्रशासनाने ठरवावे परंतू घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी करायची नाही हा निर्णय प्रशासनाला घेता येत नाही. कॉक्रीट पेव्हर ब्लॉक बसविण्याचा प्रस्ताव आला. याशी कुणी निगडीत आहे काय डायरेक्ट कंपनीशी कॉन्टॅक्ट केला आहे काय?१० लक्षचे काम करण्यासाठी कार्यवाही होत नाही. ३.५० कोटीचा हे काम करीत आहोत. कामाचे नियोजन नसल्यामूळे एन - ८ मध्ये शिवदत्त हौसींग सोसायटीमध्ये रस्ते वाहून गेले.मा.

आमदार श्री.अवचट तसेच खासदार श्री.राजकुमारजी धूत यांचे निधीतून ते रस्ते केले होते. ते काम करण्यास प्रशासनाने मंजूरी दिलेली नाही. शासनाला दया आली म्हणून २४ कोटी रूपये दिले व ३.५० कोटीची कामे करून त्याचा दुरूउपयोग करण्याचे काम प्रशासन करीत आहे.५ लक्षचे काम करायचे असेल तर हेड मध्ये बदल करून घ्यावा लागतो. जे चौक नमूद केले यातील काही चौकाचे नुकतेच कामे केलेले आहे. सार्वत्रिक निवडणुकीच्या अगोदर काही चौकाचे काम केलेले आहे.यापूर्वी सभागृहाने जो निर्णय घेतला होता त्याची अमबजावणी न करता शहरात मोठमोठे रस्त्यावर खड्डे पडले असतांना हा प्रस्ताव आणण्याची गरज नव्हती.ही रक्कम ॲड करून सिमेंन्ट कॉक्रीटचे रस्ते करण्याचा निर्णय घेण्यात यावा.

श्री. सलीम खान : सभागृहाची पूर्णत: दिशाभूल करून प्रस्ताव पास करून घेण्याचा प्रयत्न यात होता असे दिसते.

श्री. संजय सिरसाट :आपण जेंव्हा निर्णय घेतला होता त्यावेळी शासनाकडून रस्त्यासाठी कोणताही निधी आलेला नव्हता. जवळपास ९ रस्ते ते ६० ते ७० कोटीचे होते. २४ कोटी शासनाचे अनुदान आलेले आहे. ९ रस्ते केले तर ते सर्व शहरातील रस्त्याचा जोडणारे रस्ते आहे.यात आणखी काही रस्ते ॲड करायचे असेल तर ते करावे व सिमेंन्टचे रस्ते करावे. यापूर्वीही शासनाचा जो निधी आलेला आहे तोया डिफर पेमेन्टमध्ये वळती करावा आणि या शहरात सुंदर असे कॉक्रीट रस्ते करण्याचा निर्णय घेण्यात यावा.

श्री. नासेर नाहदी : माझ्या वार्डात नदीच्या पूराचे पाणी आले. नागरीकांच्या जीवीतास धोका निर्माण झाला.होता. त्यावेळी दुर्लक्ष करण्यात आले. तेथील समस्या सोडविल्या नाही. व असे प्रस्ताव आणून खर्च करणे योग्य नाही रद्य करावे.व या रक्कमेतून माझ्या वार्डाच्या लगत असलेल्या नदीला संरक्षित भिंत करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : ज्या भागातील चौक दर्शविले आहे, त्या भागातील रस्ते करावे.

डॉ. भागवत कराड : शहराच्या संपूर्ण भागात हा निधी खर्च करावा.

श्री. त्र्यंबक तूपे : संपूर्ण शहराच्या रस्त्यासाठी हा निधी खर्च करण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : हा पूर्ण निधी सर्व शहरासाठी वापरावा.

मा. महापौर : हा निधी शासनाकडून रस्त्यासाठी आलेला आहे. इतर कामासाठी वापरता येणार नाही. सभागृहाच्या भावना लक्षात घेवून हा प्रस्ताव रद्य करून यापूर्वी सभागृहाने ९ रस्ते करण्यास मान्यता दिलेली होती. डिफर पेमेन्टच्या बाबतीत शासनाचा हा जो निधी आलेला आहे तो त्यामध्ये ॲड करून ९ रस्ते आर.सीसी चे तयार करावेत.यास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे,सदर प्रस्ताव रद्द करण्यात येत असून सभागृहाने यापूर्वी ९ रस्ते तयार करण्यास मान्यता दिलेली आहे, हे शासनाच्या निधीतून करण्यात येत असल्यामूळे या प्रस्तावातील निधी त्यात समाविष्ट करून विविध ९ आर.सी.सी.चे रस्ते तयार करण्यास मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३/५ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२४ चिकलठाणा औद्योगिक वसाहत परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसूची नुसार रक्कम रू.२४,९४,१४६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात

आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात पुर्न:डांबरीकरण या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेला असून कामावरील आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

तरी रू.२४,९४,१४६/- च्या अंदाजपत्रकास मंजूरीस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२४ चिकलठाणा औद्योगिक वसाहत परिसरातील रस्त्याचे डांबरीकरण करणे रक्कम रू.२४,९४,१४६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९४/६ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, उड्डाणपुल (रेल्वेस्टेशन) रस्त्याची दुरूस्ती करणे या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१४,९७,७७७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामासाठी सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात ५ लाखाची आर्थिक तरतूद ठेवण्यात आली आहे. व उर्वरीत १० लाखाची आर्थिक तरतूद स्थायी समिती व सर्वसाधारण सभा यांनी काही अनाधिकृत वसाहतीमध्ये कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद ठेवलेली आहे. तथापी अनाधिकृत वसाहतीमध्ये विकासाची कामे करण्यात येत नसल्यामूळे सदर कामाच्या तरतूदीमधून या कामावर (१० लक्ष) वळती करणे योग्य वाटते.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उड्डाणपुल (रेल्वेस्टेशन) रस्त्याची दुरूस्ती करणे या कामाकरीता र.रू.१४,९७,७७७/- चे अंदाजपत्रकास तसेच अनाधिकृत वसाहतीमध्ये विकासाची कामे करण्यात येत नसल्यामूळे सदर कामाच्या तरतूदीमधून या कामावर उर्वरीत र.रू.१०.०० लक्ष वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९५/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पामध्ये पान क्र.एम-२९ (M-29) वर मनपा पशुचिकीत्सालय करीता ५२.५० लाख तरतूद करण्यात आली आहे. या वर्षात एवढी रक्कम पशुचिकित्सालयसाठी खर्च होणार नाही. या विभागातील इतर कामे ज्यात प्रामुख्याने पडेगांव कत्तलखाना येथे 'बायोमीथेनेशन बायोगॅस प्लांट' व घाण पाण्याचे शुध्दीकरण प्रक्रीया रू.३७ लाख व उर्वरीत १३ लाख पडेगाव कत्तलखाना वसाहतीत व गोदामपर्यंत जाण्याकरीता रस्ते या कामासाठी तरतूद ठेवलेली नसल्याने या तरतूदीतून ही कामे करता येतील. घाणपाण्याचे शुध्दीकरण प्रक्रीया प्लांट उभारल्यास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे देखील अक्षेप संपूष्टात येतील.

करीता लेखाशिर्ष बदलण्यासाठी तसेच बायोगॅस प्लांटला प्रशासकीय मान्यता देणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : पशुचिकित्सालयासाठी जे ५२ लक्षची तरतूद ठेवली होती तेथे बायोमिथेनेशन बायोगॅस प्लांट करणार आहात.यासाठी ५० टक्के केंद्र शासनाचे सबसिटी असते का? बायोगॅस प्लांट केल्यानंतर त्याचा उपयोग काय करणार आहात.

संचालक प्राणी संग्रहालय : कत्तलखाना स्लाटरहाऊस पडेगाव येथे जे वेस्ट निघते त्याचा वापर करून बायोगॅस प्लांट महानगरपालिकेस तयार करायचा आहे. यापासून विद्युत निर्मिती होईल, जनरेटर चालेल,स्लाटर हाऊसला लाईटचा वापर करता येवू शकतो. सबसिटी बाबत प्रोजेक्ट केल्यानंतर शासनास तसे कळविले जाते. पाण्याचे

शुध्दीकरण होईल. तयार होईल त्यातून महापालिकेला फायदा होईल. या संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळ तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे निर्देश आलेले आहे त्याचे पालन होईल.

डॉ. भागवत कराड : बायोगॅसचा वापर लाईटसाठी करणार आहोत असा खूलासा केला असे टेक्नीक आपल्याकडे आहेत हे सत्य आहे. माझ्या माहिती प्रमाणे बरोबर वाटत नाही. मंजूर करावा परंतू नियोजन बध्द काम करावे.

संचालक प्राणि संग्रहालय : स्लॉटर हाऊसला डिस्पोजल साठी मा. न्यायालयाचे स्पष्ट आदेश आहे याप्रमाणे तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळाने याबाबतीत स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत.

श्री.प्रशांत देसरडा : हा प्रोजेक्ट इतर कोणत्या महानगरपालिकेत बसविलेला आहे का,याची माहिती घ्यावी.

संचालक प्राणी संग्रहालय : आपल्याकडे जो प्रोजेक्ट रिपोर्ट आलेला आहे, भाभा ॲटामिनी रिसर्च सेंटर यांचे सौज्ञन्याने त्या प्रोजेक्टच्या अधारे मी माहिती देत आहे. इतर महानगरपालिकेत मी माहिती घेतलेली नाही. या महानगरपालिकेने सुरू केले तर माहिती घेता येईल.

डॉ. भागवत कराड : हया प्रोजेक्टची माहिती घेण्यासाठी डॉ.रझवी तसेच त्या वार्डाचे स.सदस्य यांना पाठविण्यात यावे माहिती घेवून नंतर प्रस्ताव ठेवावा.

संचालक प्राणी संग्रहालय : चांगला प्रकल्प आहे, सॉलिड वेस्ट ट्रीटमेंट अनिवार्य आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत, तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने कालमर्यादा दिलेली आहे. यापासून विद्युत निर्मितीचा फायदा होईल.

मा.महापौर : मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पामध्ये पान क्र.एम-२९ (M-29) वर मनपा पशुचिकीत्सालय करीता ठेवण्यात आलेल्या र.रू.५२.५० लाख तरतूदीतून पडेगांव कत्तलखाना येथे बायोमीथेनेशन बायोगॅस प्लांट व घाण पाण्याचे शुध्दीकरण प्रक्रीया र.रू.३७.०० लाख व उर्वरीत र.रू.१३.०० लाख पडेगाव कत्तलखाना वसाहतीत व गोदामपर्यंत जाण्याकरीता रस्ते या कामासाठी लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९६/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, एमआयडीसी रेल्वेस्टेशन भागातून बीड बायपास रस्त्यावर जाण्यासाठी ओव्हरब्रीज नसल्याने नागरीकांना दै.देवगिरी तरूण भारत जवळील मार्गे बऱ्याच अंतराहून ये-जा करावी लागते त्यामूळे नागरीकांना होणारा वेळेचा अपव्यव व त्रास न होण्यासंदर्भाने जिल्ह्याचे खासदार मा.चंद्रकांतजी खैरे यांनी मा.विभागीय आयुक्त यांच्याकडे दिनांक २६.०५.२००६ रोजी बैठक आयोजीत करण्यात आलेली होती सदरील बैठकीस मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यासह खालीलप्रमाणे महानगरपालिका,एमआयडीसी, व रेल्वे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

०१. अधिक्षक अभियंता एमआयडीसी औरंगाबाद
०२. शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद
०३. कार्यकारी अभियंता एमआयडीसी औरंगाबाद
०४. सिनीअर डिव्हीजनल इंजिनियर रेल्वे विभाग नांदेड
०५. असिस्टंट इंजिनियर जालना रेल्वे विभाग

सदरील बैठकीमध्ये चर्चेनुसार, एमआयडीसी रेल्वेस्टेशन भागातुन बीडबायपास रस्त्यावर जाण्यासाठी ओव्हरब्रीज नसल्याने नागरीकांना दै.देवगीरी तरूण भारत जवळील मार्गे बऱ्याच अंतराहून ये-जा करावी लागते त्यामुळे नागरीकांना होणारा वेळेचा अपव्यय व त्रास न होण्या करीता एमआयडीसी भाग रेल्वेस्टेशन ते बीडबायपास असा रेल्वेपटरीवरून जाणारा आर.ओ.बी. (रोड ओव्हर ब्रीज) बांधण्याचे सर्वानुमते ठरल्यानुसार प्रस्तावित ओव्हरब्रीजच्या कामासाठी येणारा खर्च हा क्रमश: रेल्वे विभाग रेल्वे च्या

भागावर येणाऱ्या पुलासाठीची किंमत देणार असुन उर्वरीत खर्च हा महानगरपालिका आणि एमआयडीसी विभाग विभागुन करणार आहे प्रस्तावीत ओव्हरब्रीज करीता एमआयडीसी विभागाने तयार केलेल्या नकाशानुसार अंदाजे रक्कम रूपये ७.६० कोटी खर्च अपेक्षित आहे तसेच रेल्वे विभाग सदर ब्रिजच्या कामासाठी किती खर्च देणार आहे याबाबत अद्याप रेल्वे विभागाने कळविले नसल्याने जेव्हा रेल्वे विभाग ब्रीज साठी किती रक्कम देणार आहे हे समजल्यानंतर उर्वरीत खर्चाची रक्कम ही महानगरपालिका आणि एमआयडीसीने ५०%+५०% या समप्रमाणात खर्च करावयाची आहे.

करीता एमआयडीसी भाग रेल्वेस्टेशन ते बीडबायपास असा रेल्वेपटरीवरून जाणारा आर.ओ.बी. (रोड ओव्हर ब्रीज)बांधण्याचा तसेच सदर ब्रीजसाठी वरील प्रमाणे खर्च करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. भागवत कराड : हा ओव्हरब्रीज रस्ते महामंडळाचे तर्फे करणार असेल तर संबधीत मुख्य अभियंता यांचेशी चर्चा करावी जर करणार असतील तर महानगरपालिकेचा खर्च होणार नाही.

मा. महापौर : महानगरपालिकेचा ५० टक्केच खर्च होणार आहे यामुळे शहराचा विकास होणार आहे या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एमआयडीसी भाग रेल्वेस्टेशन ते बीडबायपास असा रेल्वेपटरीवरून जाणारा आर.ओ.बी. ओव्हरब्रीज करीता एमआयडीसी विभागाने तयार केलेल्या नकाशानुसार अंदाजे रक्कम रूपये ७.६० कोटी अपेक्षित खर्च असल्यामूळे,तसेच रेल्वे विभाग सदर ब्रिजच्या कामासाठी किती खर्च देणार आहे, याबाबत अद्याप रेल्वे विभागाने कळविले नसल्याने, जेव्हा रेल्वे विभाग ब्रीजसाठी किती रक्कम देणार आहे, हे समजल्यानंतर उर्वरीत खर्चाची रक्कम ही महानगरपालिका आणि एमआयडीसीने ५०%+५०% या समप्रमाणात खर्च करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९७/९ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेचा गट 'क'व'ड'मधील कर्मचाऱ्यांना सन २००५-२००६ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणानिमित्ताने सानुग्रह अनुदान अदा करण्यात येईल असे मा.महापौर यांनी आश्वासित केले आहे. यानुसार सन २००४-२००५ या आर्थिक वर्षासाठी ज्या दराने सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले, त्यानुसार सन २००५-२००६ या आर्थिक वर्षासाठी ३० दिवसाचा बोनस द्यावयाचा झाल्यास याप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

४२०० स्थायी कर्मचाऱ्यांसाठी ४२००×२४१९= रू.१,०१,५९,८००/- खर्च अपेक्षित आहे.

४४५ दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रू.४४५×१५००= रू.६,६७,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

एकुण बोनस व दिवाळी भेट वाटपासाठी रू.१,०८,२७,३००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २००६-०७ च्या अंदाजपत्रकात सानुग्रह अनुदानासाठी रू.१.०० लक्ष ची तरतुद करण्यात आलेली आहे. रू.१,०७,२७,३००/- ची वाढीव तरतुद करावी लागणार आहे.शासन निर्णय क्र.जीईएन १०९७/प्र.क्र.२६७/९७/नावि-२४/दि.१४ जुलै १९९८ च्या महानगरपालिकेचे कोणतेही देणी शिल्लक न ठेवता व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन निर्णय घेण्याचे आदेश आहेत.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिकेच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान तसेच अस्थायी कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट देणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. संतोष खेंडके : माझ्या माहिती प्रमाणे दैनिक वेतनावर २५१ कर्मचारी काम करतात प्रस्तावात ४४५ कर्मचाऱ्याना सानुग्रह अनुदानासाठी मागणी केलेली आहे.

प्र.मुख्यलेखाधिकारी : महापालिकेच्या अस्थापनेवर ३१३ व १३१ बालवाडी शिक्षीका कार्यरत असून एकूण ४४५ कर्मचारी कार्यरत आहे. त्यांना सानुग्रह अनुदान किंवा दिवाळी भेट देण्या संदर्भात उल्लेख केला आहे.

श्री. संतोष खेंडके :मागिल वर्षी ज्या प्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात आले त्याप्रमाणेच यावर्षीही देण्यात यावे ही विनंती.

श्री. हिम्मतराव दाभाडे : सफाई कर्मचारी यांना १५०० रूपये सानुग्रह अनुदान देण्याचे ठरविले. त्याऐवजी कमीत कमी ३००० रूपये देण्यात यावे.

श्री. संजय सिरसाट : नियमानुसार जे देता येते, ते देण्यात यावे.

मा. महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचा गट 'क'व'ड'मधील कर्मचाऱ्यांना सन २००५-२००६ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणानिमित्ताने स्थायी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येकी रू.२४१९/- बोनस तसेच दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रू.१५००/- दिवाळी भेट म्हणून अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. बोनस व दिवाळी भेट वाटपासाठी लागणाऱ्या एकूण र.रू.१,०८,२७,३००/- च्या खर्चास तसेच सन २००६-०७ च्या अंदाजपत्रकात सानुग्रह अनुदानासाठी र.रू.१,०७,२७,३००/- ची वाढीव तरतुद करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९८/१० :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.७८ चिकलठाणा येथील अंतर्गत काँक्रीट रस्ते बांधणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये २९,७०,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००६-०७ या आर्थिक वर्षात नविन काँक्रीट रस्ते (स्लम) या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे व मा.सर्वसाधारण सभे समोर सादर करण्याचे आदेशित केले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.२९,७०,१००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभागृहासमोर मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय क्र .१० ते १४ मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७८ चिकलठाणा येथील अंतर्गत काँक्रीट रस्ते बांधणेच्या कामाचे र.रू.२९,७०,१००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९९/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीतील मेन होल्स,खूल्या गटारी, जलनि:सारण व्यवस्थेच्या देखभाल दुरूस्ती अंतर्गत एस.एफ.आर.सी.कव्हर्स (ढापे) पुरवठा करणेसाठी अर्थसंकल्प पुस्तिका सन २००६-०७ मध्ये पान क्र.१६५ वर एकूण पाच वार्डासाठी प्रत्येकी पाच लक्ष प्रमाणे रक्कम रूपये २५.०० लक्ष आणि पृष्ट क्र.१११ वर एक वार्ड साठी रूपये ५.०० लक्ष असे एकूण रूपये ३०.०० लक्षची तरतूद ठेवण्यात आली आहे. या सर्व प्रभागातून एस.एफ.आर.सी.कव्हर्स (ढापे) टाकण्याची मागणी होत असल्याने पुरवठा करणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये ३०,०२,२७०/- तयार करण्यात आले आहे. तरी विविध प्रकारचे/आकाराचे एस.एफ.आर.सी.कव्हर्स (ढापे) पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ३०,०२,२७०/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एकूण सहा प्रभागातून विविध प्रकारचे/आकाराचे एस.एफ.आर.सी. कव्हर्स (ढापे) पुरवठा करण्याचे र.रू.३०,०२,२७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५००/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, चिकलठाणा गांवातून स्मशानभूमीस जाण्याकरीता असलेल्या रस्त्यावरील पुलाचा काही भाग अतिवृष्टीमूळे वाहून गेलेला आहे. त्यामूळे गावातून स्मशानभूमी व शेतावर जाण्यासाठी असणारा मार्ग बंद झालेला असून नागरीकांची गैरसोय होत आहे. त्यामूळे या ठिकाणी तातडीने पुल बांधणे आवश्यक आहे. सुखना नदीवर यापूर्वी सिमेंट पाईपचा पुल होता त्यात कचरा अडकून तो पुरामूळे वाहून गेलेला आहे. त्याऐवजी आता जास्त उंचीचा पुल बांधण्यात यावा. त्याकरीता उचित कार्यवाही करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.साहेबराव कावडे अनुमोदक : श्री.संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा गांवातून स्मशानभूमीस जाण्याकरीता असलेल्या रस्त्यावरील पुलाचा काही भाग अतिवृष्टीमूळे वाहून गेलेला असल्यामूळे,त्या ठिकाणी जास्त उंचीचा पुल बांधणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०१/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, चिकलठाणा गांवातून सावता मंगल कार्यालयास व ज्ञानदीप शाळेस जाण्याकरीता असलेल्या रस्त्यावरील पुल अतिवृष्टीमूळे वाहून गेलेला आहे. त्यामूळे गावातून मंगल कार्यालय व शाळेस जाण्यासाठी असणारा मार्ग बंद झालेला असून नागरीक व विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. त्यामूळे या ठिकाणी तातडीने पुल बांधणे आवश्यक आहे. सुखना नदीवर यापूर्वी सिमेंट पाईपचा पुल होता त्यात कचरा अडकून तो पुरामूळे वाहून गेलेला आहे. त्याऐवजी आता जास्त उंचीचा पुल बांधण्यात यावा. त्याकरीता उचित कार्यवाही करणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.साहेबराव कावडे अनुमोदक : श्री.संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा गांवातून सावता मंगल कार्यालयास व ज्ञानदीप शाळेस जाण्याकरीता असलेल्या रस्त्यावरील पुल अतिवृष्टीमूळे वाहून गेलेला असल्यामूळे,त्या ठिकाणी जास्त उंचीचा पुल बांधणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा प्रभागात गोसावी समाजासाठी स्मशानभूमी नाही, त्यामूळे नागरीकांची गैरसोय होत आहे. गोसावी समाजासाठी स्मशानभूमी असावी अशी येथील नागरीकांची मागणी आहे. याआधी गोसावी समाजाचे नागरीक महादेव मंदीराच्या जागेवर अंत्यविधी करीत असत. या जागेवर महादेव मंदिराचे बांधकाम करण्यात येणार आहे. त्यामूळे गोसावी समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमीची आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी चिकलठाणा प्रभागातील जून्या स्मशानभूमीच्या पूर्व बाजूस नदीच्या काठावर पोटखराब शासनाची जागा उपलब्ध आहे. या जागेवर गोसावी समाज स्मशानभूमी विकसीत करण्यात यावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.साहेबराव कावडे अनुमोदक : श्री.संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा प्रभागात गोसावी समाजासाठी जून्या स्मशानभूमीच्या पूर्व बाजूस नदीच्या काठावर शासनाच्या पोटखराब उपलब्ध जागेवर गोसावी समाज स्मशानभूमी विकसीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**पुरवणी विषय**

**विषय क्र. ५०३/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये

०१. मिटमिटा येथील स्मशानभूमी विकसीत करणे या कामासाठी इमारत व उद्यान बांधकाम पृष्ट क्र.डब्ल्यु५५ वर २.०० लक्ष रू. तरतूद उपलब्ध आहे, तसेच ०२.मिटमिटा येथील दलित स्मशानभूमीस

संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी इमारत व उद्यान बांधकाम पृष्ट क्र.डब्ल्यु ५५ वर १.५० लक्ष तरतुद उपलब्ध आहे. या कामा ऐवजी

मिटमिटा येथील मुस्लिम कब्रस्तान संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी ३.१५ लक्ष रू.तरतूद ठेवण्यात यावी.

सुचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन अनुमोदक : श्री.जावेद कुरैशी

**संवाद :**

मा.महापौर : पुरवणी बरोबरच काही ऐनवेळचे प्रस्ताव आलेले आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : जे ऐनवेळचे अंदाजपत्रकाचे प्रस्ताव असतील ते मंजूर करण्यात यावे.

मा.महापौर : पुरवणी विषयासह, शासकीय व अशासकीय नगरसेवकांचे जे ऐनवेळचे प्रस्ताव आहे, ते सर्व मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये पृष्ट क्र.डब्ल्यु ५५ वर असलेली र.रू.२.०० लक्ष व पृष्ट क्र.डब्ल्यु ५५ वर असलेली र.रू.१.५० लक्ष तरतुद **याऐवजी** मिटमिटा येथील मुस्लिम कब्रस्तान संरक्षित भिंत बांधणे या कामासाठी र.रू.३.१५ लक्ष असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०४/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प २००६-२००७ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलणेत यावे.

वार्ड क्र.११ भडकल गेट भागातील दगडी गटारची दुरूस्ती करणे अर्थसंकल्प सन २००६-२००७ मधील पान क्र.डब्ल्यु ९२ र.रू.१.०० लक्ष.

या कामा ऐवजी

वार्ड क्र.११ ज्युब्ली पार्क मनपा शाळा दुरूस्ती करणे बाबत र.रू.१.०० लाख. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना अनुमोदक : सौ.मसरत बेगम शरफोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,अर्थसंकल्प २००६-२००७ मधील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वार्ड क्र.११ भडकल गेट भागातील दगडी गटारची दुरूस्ती करणे अर्थसंकल्प सन २००६-२००७ मधील पान क्र.डब्ल्यु ९२ र.रू.१.०० लक्ष. **या कामा ऐवजी**

वार्ड क्र.११ ज्युब्ली पार्क मनपा शाळा दुरूस्ती करणे बाबत र.रू.१.०० लाख. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०५/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७३ हिंदुस्थान पेट्रोलियम क्वार्टर्स समोरील चौक स्वामी विवेकानंद यांचे वीस (२० फुट) उंचीचे पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी येथील नागरीकांची एकमुखाने मागणी होत आहे. करीता सदरील चौका समोर स्वामी विवेकानंद यांचे पुर्णाकृती पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे (दामुअण्णा)

अनुमोदक : श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे, सौ.पुष्पा बाळुनाना शिंदे,श्री.नारायण कुचे, श्री.बन्सीलाल गांगवे (मामा), श्रीमती जयश्री किवळेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७३ हिंदुस्थान पेट्रोलियम क्वार्टर्स समोरील चौकात स्वामी विवेकानंद यांचे वीस (२० फुट) उंचीचे पुर्णाकृती पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०६/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागातील विविध ठिकाणी डांबरीकरण करणेसाठी अर्थसंकल्पाचे पुस्तकातील शिर्षक - ''नविन कॉ.रस्ते'' पान क्र.डब्ल्यु १५३ अ.क्र.७ वर आहे. त्याऐवजी

०१. प्रभाग क्र.२९ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे वार्ड कार्यालय **क** कडे वळती- ६ लाख

०२. वार्ड क्र.२९ मध्ये फरशी दुरूस्ती,खडी रस्ते,पेव्हर ब्लॉक, गटारी दुरूस्ती, जलनिस्सारण कामे व इतर आवश्यकतेनुसार फुटकळ कामे - वार्ड कार्यालय **क** कडे वळती -४ लाख.

सुचक : श्री.जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागातील विविध ठिकाणी डांबरीकरण करणे अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु १५३ अ.क्र.७ वर असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस व वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. प्रभाग क्र.२९ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे वार्ड कार्यालय **क** कडे वळती- ६ लाख

०२. वार्ड क्र.२९ मध्ये फरशी दुरूस्ती,खडी रस्ते,पेव्हर ब्लॉक, गटारी दुरूस्ती, जलनिस्सारण कामे व इतर आवश्यकतेनुसार फुटकळ कामे - वार्ड कार्यालय **क** कडे वळती -४ लाख.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०७/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८१ जयभवानीनगर ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशनरोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी अर्थसंकल्पात पृष्ट क्र.डब्ल्यु २४ अ.क्र.३ मध्ये ३० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. सदरची तरतूद वार्ड क्र.७३ मधील एस.टी.कॉलनी प्रबोधनकार ठाकरेनगर १. मायानगर येथे स्ट्रिटपोल एनर्जीसेंव्हींग लाईट फिटींगसह लावण्यासाठी ७ लक्ष, २.मायानगर येथे ६ इंची जलवाहीनी टाकणेसाठी १० लक्ष, ३.विवेकनगर येथे ड्रेनेजलाईन टाकणेसाठी ७ लक्ष, ४.विवेकनगर येथे स्ट्रिटपोल एनर्जी सेव्हींग लाईट फिटींग लावणे साठी ६ लक्ष, वरील विकास कामासाठी वळती करणेस सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पुष्पाताई बाळुनाना शिंदे अनुमोदक : श्री.दामोधर माधवराव शिंदे, श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८१ जयभवानीनगर ते मुकूंदवाडी रेल्वेस्टेशनरोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी अर्थसंकल्पात पृष्ट क्र.डब्ल्यु २४ अ.क्र.३ मध्ये करण्यांत आलेली तरतूद र.रू.३०.०० लक्ष, वार्ड क्र.७३ मधील एस.टी.कॉलनी प्रबोधनकार ठाकरेनगर १. मायानगर येथे स्ट्रिटपोल एनर्जीसेंव्हींग लाईट फिटींगसह लावण्यासाठी र.रू.७.०० लक्ष, २.मायानगर येथे ६ इंची जलवाहीनी टाकणेसाठी र.रू.१०.०० लक्ष, ३.विवेकनगर येथे ड्रेनेजलाईन टाकणेसाठी र.रू.७.०० लक्ष, ४.विवेकनगर येथे स्ट्रिटपोल एनर्जी सेव्हींग लाईट फिटींग लावणे साठी र.रू.६.०० लक्ष या विकास कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०८/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सिडकोचे सर्व हस्तांतरण महानगरपालिकेकडे करण्यात आलेले आहे. तथापी सिडको परिसरातील ज्या ४४ गृह निर्माण संस्था आहेत, त्या संस्थाच्या सुविधांचे हस्तांतरण अद्यापी महापालिकेकडे करण्यात आलेले नाही त्यामुळे ह्या गृह निर्माण संस्थेमधील नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

तरी नागरीकांच्या अडचणींचा विचार करून सिडको परिसरातील सर्व गृह निर्माण संस्थेच्या सुविधांचे हस्तांतरण महापालिकेकडे करण्यास तसेच त्यामधील ड्रेनेज,विद्युत,रस्ते इत्यादी संबंधीत जी कामे आहेत, त्या कामांना महानगरपालिकेतर्फे मंजूरी देण्यात यावी, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे,श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.महेश माळवतकर,सौ.छाया राऊत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको परिसरातील ज्या ४४ गृह निर्माण संस्था आहेत, त्या संस्थेच्या सुविधांचे हस्तांतरण महापालिकेकडे करण्यास तसेच त्यामधील ड्रेनेज,विद्युत,रस्ते इत्यादी संबंधीत जी कामे आहेत, त्या कामांना सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ५०९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्रिडा विभागाचे वतीने आणि जिल्हा बुध्दीबळ संघटना यांचे संयुक्त विद्यमाने अखील भारतीय बुध्दीबळ महापौर चषक स्पर्धेचे आयोजन करावयाचे आहे. या स्पर्धेकरीता २,२४,२५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावित खर्च क्रिडा विभागाच्या २००६-२००७ च्या महापौर चषक क्रिडा स्पर्धाच्या लेखा शिर्षकातून करण्यात येणार होता. परंतू सदरील लेखा शिर्षकातील रक्कम महापौर चषक फुटबॉल स्पर्धेकरीता खर्ची पडली आहे.

करीता आंतरमहापालिका स्पर्धेकरीता जे राखीव बजेट आहे, त्यातून ५.०० लाखचे वाढीव वेतन पुढील महापौर चषक स्पर्धेकरीता करण्याच्या मान्यतेस्तव व मंजुरीस्तव विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका क्रिडा विभागाचे वतीने आणि जिल्हा बुध्दीबळ संघटना यांचे संयुक्त विद्यमाने अखील भारतीय बुध्दीबळ महापौर चषक स्पर्धेचे आयोजनासाठी येणाऱ्या र.रू.२,२४,२५०/- च्या खर्चास व सदरील खर्च आंतरमहापालिका स्पर्धेकरीता असलेल्या राखीव बजेट मधून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने मालमत्ता कराचे वर्गवारी करतांना, निवासी निवासेत्तर अशी दोन स्वरूपात वर्गवारी निश्चित केलेली आहे. राज्यातील इतर महानगरपालिकेमध्ये मालमत्ता कर आकारणीसाठी निवासी, व्यावसायिक व औद्योगिक अशा तीन वर्गात वर्गिकरण केलेले आहे. सदरील तफावत दूर करणे आवश्यक आहे. याबाबत औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांनी पाठपुरावा केलेला आहे. त्यानुषंगाने महागनरपालिका औरंगाबाद मध्ये ही वरील प्रमाणे निवासी, व्यावसायिक व औद्योगिक असे तीन वर्गात वर्गवारी करणेचे ठरविले आहे. तसेच सदरील वर्गवारी करतांना औद्योगिक क्षेत्रातील मालमत्तांना करयोग्य मुल्यावर सामान्य कराचा दर हा ३६% इतका प्रस्तावित करणेत येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना त्याचे व्यवसाय उभा करणे करीता मदत होणार आहे. सध्या चिकलठाणा भागातील औद्योगिक क्षेत्रातील उद्योग अडचणीत आहेत. उद्योजकांना शासनाने अनेक प्रकारे मदत देवू केल्या आहेत, चिकलठाणा भागातील औद्योगिक क्षेत्रात कारखाने सुरू असले तर तेथे अनेक बेरोजगारांना रोजगार मिळण्यास मदत होईल. चिकलठाणा एम.आय.डी.सी. क्षेत्रातील कारखानदार हे मागील बऱ्याच वर्षापासून महानगरपालिकेत मालमत्ता कर भरत आहेत. त्यांना त्या प्रमाणात सोयी-सुविधा ही पुरविल्या जात नाहीत. करीता या औद्योगिक क्षेत्राकरीता महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात या ठिकाणी सुविधा पुरविणे करीता विशेष तरतूद करणे आवश्यक आहे.

करीता चिकलठाणा एम.आय.डी.सी.क्षेत्रातील औद्योगिक वसाहतीकरीता महानगरपालिकेचे मालमत्ता कराचे वर्गिकरण निवासी व्यावसायिक तसेच औद्योगिक असे करणे योग्य तसेच सदर औद्योगिक क्षेत्राकरीता मालमत्ता कर हे करयोग्य मुल्याचे सामान्यकराचे दर ३६% या दराने वसूल करणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा एम.आय.डी.सी.क्षेत्रातील औद्योगिक वसाहतीकरीता महानगरपालिकेचे मालमत्ता कराचे वर्गिकरण निवासी व्यावसायिक तसेच औद्योगिक असे करणेस तसेच सदर औद्योगिक क्षेत्राकरीता मालमत्ता कर हे करयोग्य मुल्याचे सामान्यकराचे दर ३६% या दराने वसूल करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५११ :**

आयुक्त,महानगरपालिका यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०३ एस.बी.ओ. शाळेसमोरील खूल्या जागेवर बॅडमिंटन हॉल बांधून खेळाचे मैदान,जॅगींग ट्रॅक व संरक्षित भिंत बांधणेकरीता सा.बां.विभागाच्या सन २००५-०६ च्या जिल्हा दरसूची नुसार रक्कम रू.२२,४०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००६-०७ या आर्थिक वर्षा अंतर्गत ''विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण'' या लेखाशिर्षातून पान क्र.डब्ल्यु-५६ अ.क्र.१५. तसेच मा.सर्वसाधारण सभेने दिनांक ११.०८.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता दिल्यानुसार वळती केलेल्या तरतूदीतून करण्यात येईल.

त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२२,४०,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०३ एस.बी.ओ. शाळेसमोरील खूल्या जागेवर बॅडमिंटन हॉल बांधून खेळाचे मैदान,जॅगींग ट्रॅक व संरक्षित भिंत बांधणे रक्कम रू.२२,४०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१२ :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिद्धार्थ उद्यान बोल्ट प्रकल्प पुर्णत्वानंतर सदर प्रकल्पातील छताची मालकी महानगरपालिकेची राहणार आहे. सदर सिद्धार्थ उद्यान बोल्ट प्रकल्पाचे विकसक यांनी सदर प्रकल्पातील छताची (Teracess) भाडेतत्वावर (मुळ निविदातील भाडेतत्वाचा दर म्हणजेच रू.साठ प्रतिवर्ष प्रती चौरस मीटर क्षेत्र) मिळण्यासाठी मागणी केली आहे. सदरहू मागणी अणुषंगाने प्रकल्पातील छताचा वापर भाडेतत्वावर देण्यासाठीची धोरणात्मक बाब असल्याने या अणुषंगाने मा.सर्वसाधारण सभागृहाकडून धोरणात्मक बाबीसाठी मान्यता मिळण्यासाठी प्रकरणी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिद्धार्थ उद्यान बोल्ट प्रकल्पाचे विकसक यांना (मुळ निविदातील भाडेतत्वाचा दर म्हणजेच रू.साठ प्रतिवर्ष प्रती चौरस मीटर क्षेत्र) प्रकल्पातील छताचा (Teracess) वापर त्यांना भाडेतत्वावर देण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१३ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-८ भागात महानगरपालिकेच्या दवाखान्याच्या मागील बाजूस १५ लाख लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्याचे काम सुरू झालेले आहे. एन-८ भागात नविन जलकुंभ भरण्यासाठी एन-७ पंप हाऊस ते एन-८ नविन जलकुंभापर्यंत ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकणे अत्यंत आवश्यक आहे. या कामाचे अंदाजपत्रक र.रू.३८,७४,७१०/- चे महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचे दरसुची सन २००५-०६ नुसार तयार करण्यात आलेले असुन, या कामावर होणारा खर्च सन २००६-०७ अर्थ संकल्पात पान १७२, पृष्ठ - ४ वर भांडवली कामे या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या रू.४०.०० लक्ष तरतूदमधून करण्यात येणार आहे.

करीता एन-७ पंपींग हाऊस जळगांव रस्ता ते एन-८ प्रस्तावीत जलकुंभापर्यंत ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक र.रू.३८,७४,७१०/- चा प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-८ भागात महानगरपालिकेच्या दवाखान्याच्या मागील बाजूस सुरू असलेल्या १५ लाख लिटर क्षमतेचे नविन जलकुंभ भरण्यासाठी एन-७ पंप हाऊस ते एन-८ नविन

जलकुंभापर्यंत ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकणेच्या कामाचे र.रू.३८,७४,७१०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१४ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र.९३ वेदांतनगर अंतर्गत रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसुची सन २००५-०६ अन्वये तयार करण्यात आले असुन कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.२५,०५,५१९/- इतकी आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची प्रशासकीय मान्यता झाली असुन या कामाचा खर्च खालील प्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभाग फ अर्थसंकल्प पृ.क्र.१४५ अ.क्र.२३ (पुर्न:डांबरीकरण शहर) | १०.०० लाख |
| २ | मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.३१५/३५ दि.११.८.०६ अन्वये या कामासाठी उपलब्ध तरतूद | १०.०० लाख |
| ३ | अर्थसंकल्प २००६-०६ पृ.क्र.१७५ वरील या प्रभागातील डांबरीकरणासाठी उपलब्ध तरतूद | ५.०० लाख |
| | एकुण :- | २५.०० लाख |

करीता रक्कम रू.२५,०५,५१९/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९३ वेदांतनगर अंतर्गत रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणेच्या कामाचे रक्कम रू.२५,०५,५१९/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ च्या उपलब्ध तरतूदीतून करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७६ मो.रामनगर सिडको येथील श्री.राज प्राथमिक शाळेच्या पाठीमागील नाला नागरीकांच्या अतिक्रमणामुळे अरूंद होत असल्यामुळे नाल्यास संरक्षित भिंत बांधणे च्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा/सा.बां. खात्याच्या सन २००५-०६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन, अंदाजपत्रक र.रू.३०,००,०००/- आहे. मा.सर्वसाधारण सभा ठराव/विषय क्रमांक ४७८ अन्वये दिनांक २५/०९/२००६ सन २००६-०७ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान क्र. १६६/१८ वरील सिव्हरेज ट्रीटमेंट प्लँट विकसित करणेच्या तरतूदीमधुन वळती करून अर्थतरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामधुन या कामाचा खर्च भागविणेचे प्रस्तावित आहे.

र.रू.३०,००,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७६ मो.रामनगर सिडको येथील श्री.राज प्राथमिक शाळेच्या पाठीमागील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे र.रू.३०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सर्वसाधारण सभा ठराव/विषय क्रमांक ४७८ अन्वये दिनांक २५/०९/२००६ सन २००६-०७ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील पान क्र. १६६/१८ वरील सिव्हरेज ट्रीटमेंट प्लँट विकसित करणेच्या तरतूदीमधुन वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६७ येथे मो.बौध्द नगर परिसर तसेच पंचशील नगर येथे २२५ मी.मी. व २५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यू.जी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक मा.जी.प्रा.विभागाच्या सन २००५-०६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन, अंदाजपत्रक र.रू.२८,६१,८००/- होत आहे. सदरील काम महाराष्ट्र शासनाच्या नागरी दलीत वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो/१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४/मंत्रालय, मुंबई-

४०० ०३२ दिनांक १३ मार्च, २००६ सहपत्रावरील अ.क्र. १२४ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेस रक्कम रू.१६७.५८ लक्ष उपलब्ध तरतुदीमधून प्रस्तावीत आहे.

अ.प.रक्कम रू.२८,६१,८००/- मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६७ येथे मो.बौध्द नगर परिसर तसेच पंचशील नगर येथे २२५ मी.मी.व २५० मी.मी. व्यासाची एस.डब्ल्यू.जी.ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाचे र.रू.२८,६१,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम महाराष्ट्र शासनाच्या नागरी दलीत वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत शासन निर्णय क्र./पुरक/विधयो/१०२००६/प्र.क्र.१२/२००६/नवि-४/मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक १३ मार्च, २००६ सहपत्रावरील अ.क्र. १२४ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेस रक्कम रू.१६७.५८ लक्ष उपलब्ध तरतुदीमधून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील खूली जागेची देखभाल दुरूस्ती या कामासाठी ठेवण्यात आलेल्या २००६-२००७ च्या अर्थसंकल्पामध्ये वार्ड क्र.२८ नेहरूनगर पृष्ठ क्र.डब्ल्यु ११० अ.क्र.२ खूली जागाची देखभाल दुरूस्तीसाठी ९०,००० नव्वद हजार रू.ठेवण्यात आलेले आहेत. परंतु वार्डात आवश्यक असणारे काम ५०००० हजार रूपये औरंगाबाद टाईम्स कॉलनीत नाल्याची संरक्षित भिंत बांधण्यासाठी व ४०,००० हजार रू. पेव्हर ब्लॉकसाठी मंजूर करून (९०,०००) च्या हेडचेंज करून हे दोन कामाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत हेडचेंज करून देण्यांत यावे.

सुचक : सौ.खान मेहरून्निसा हमीद खान अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये वॉर्ड क्र.२८ नेहरूनगर साठी पृष्ठ क्र.डब्ल्यु ११० अ.क्र.२ वर ठेवण्यात आलेली तरतूद **याऐवजी** वॉर्डातील औरंगाबाद टाईम्स कॉलनीत नाल्याची संरक्षित भिंत बांधणे र.रू.४०,०००/- व पेव्हर ब्लॉक बसविणे र.रू.५०,०००/- असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, रेल्वेस्टेशन भाजी मंडी लगत असलेल्या अतिक्रमणामध्ये काढण्यात आलेल्या टपऱ्यांचे स्व.आनंद गाडे चौक (आयटीआय) या मुख्य रस्त्यावरील मनपाच्या गाळ्यांशेजारी पुनर्वसन करण्यात यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.अल्पा विकास जैन अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन भाजी मंडी लगत असलेल्या अतिक्रमणामध्ये काढण्यात आलेल्या टपऱ्यांचे स्व.आनंद गाडे चौक (आयटीआय) या मुख्य रस्त्यावरील मनपाच्या गाळ्यांशेजारी पुनर्वसन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.९ जयसिंगपुरा भागात रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे पृष्ठ क्र.डब्ल्यु ८६ अ.क्र.४ (१.०० लक्ष रूपये) तरतूद अर्थसंकल्पातून करण्यात आली आहे.

या कामाऐवजी करावयाची कामे खालीलप्रमाणे.

प्रभाग क्र.९ जयसिंगपुरा भागात पठाणिया व एम.एम.काझी यांच्या घरासमोरील दोन्ही बाजूस पेव्हींग ब्लॉक बसविणे करीता १.०० लक्ष रूपयेमध्ये कामे करण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.पुरूषोत्तम रघुविरसिंह ठाकुर अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.९ जयसिंगपुरा साठी अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.डब्ल्यु ८६ अ.क्र.४ वर असलेली र.रू.१.०० लक्ष तरतूद **याऐवजी** प्रभाग क्र.९ जयसिंगपुरा भागात पठाणिया व

एम.एम.काझी यांच्या घरासमोरील दोन्ही बाजूस पेव्हींग ब्लॉक बसविणे र.रू.१.०० लक्ष असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.२८ येथे युनूस कॉलनी, कटकटगेटच्या खूल्या जागेवर भिंत बांधणे करीता रूपये ३,१५,०००/- चा अर्थसंकल्प पान क्र.डब्ल्यु ४७ अ.क्र.२ मध्ये खर्च आहे. तरी ही रक्कम मला राहत कॉलनी, पंचायत समितीचे मागे रिटेनिंग वॉल करीता हेड बदलून देण्यांत यावे. कारण की, तेथे लोकांना नाल्याच्या पाण्याची भिती आहे.

तरी आपण सर्वसाधारण सभेमध्ये या कामास मंजुरी देण्याची कृपा करावी.

सुचक : सौ.खान मेहरून्निसा हमीद खान अनुमोदक : श्री.अबुबकर अमोदी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ साठी अर्थसंकल्प पान क्र.डब्ल्यु ४७ अ.क्र.२ वर असलेली र.रू.३,१५,०००/- तरतूद **याऐवजी** राहत कॉलनी, पंचायत समितीचे मागे रिटेनिंग वॉल बांधणेकरीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, कॉंक्रेटींग कामाचे वार्ड क्र.२८ सदफ कॉलनी येथील सि.डी.वर्क व कॉंक्रेटींग करण्याकरीता पात्र रक्कम रूपये २,४८,३५८/- आले आहे. आपण हे काम त्रिमुर्तीनगर येथे बदलून देणे करीता सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात यावी ही विनंती.

सुचक : सौ.खान मेहरून्निसा हमीद खान अनुमोदक : श्री.अबुबकर अमोदी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ साठी अर्थसंकल्पात सदफ कॉलनी येथील सि.डी.वर्क व कॉंक्रेटींग करण्याकरीता असलेली र.रू.२,४८,३५८/- तरतूद **याऐवजी** त्रिमुर्तीनगर येथे सि.डी.वर्क व कॉंक्रेटींग करणे असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,सन२००६-०७च्याअर्थसंकल्पात खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली होती,सदर तरतुदीतून खालीलप्रमाणे काम करून लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत यावी.

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु १२७/४ | वार्ड इ मध्ये स्मशानभूमीची देखभाल दुरूस्ती करणे-५.०० | वार्ड इ मध्ये जलनि:सारण देखभाल दुरूस्ती करणे-३.४० लक्ष |
| २ | डब्ल्यु १२८/४ | वार्ड इ मध्ये शौचालय देखभाल दुरूस्ती करणे-५.०० | वार्ड इ मध्ये रस्ते देखभाल दुरूस्ती करणे-२.१० लक्ष |

सुचक : श्रीमती जयश्री किवळेकर अनुमोदक : श्री.भगवान (बापु) घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु १२७/४ | वार्ड इ मध्ये स्मशानभूमीची देखभाल दुरूस्ती करणे-५.०० | वार्ड इ मध्ये जलनि:सारण देखभाल दुरूस्ती करणे-३.४० लक्ष |
| २ | डब्ल्यु १२८/४ | वार्ड इ मध्ये शौचालय देखभाल दुरूस्ती करणे-५.०० | वार्ड इ मध्ये रस्ते देखभाल दुरूस्ती करणे-२.१० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड इ कार्यालय हे सामान्य वार्डातील नागरीकांना पाणीपट्टी भरणे, मालमत्ता कर भरणे इतर कार्यालयीन कामासाठी अत्यंत दूर पडत असल्यामूळे सदरील कार्यालय सिडको कार्यालयातील जी इमारत महानगरपालिकेस हस्तांतर झालेली आहे सद्या पहिल्या मजल्यावर वार्ड-ब चे कार्यालय असून, तळमजल्यावर वार्ड-इ कार्यालय स्थलांतरीत करण्यात यावे, करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्रीमती जयश्री किवळेकर अनुमोदक : श्री.भगवान (बापु) घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड इ कार्यालयहे सिडको कार्यालयातील जी इमारत महानगरपालिकेस हस्तांतर झालेली आहे, सद्या पहिल्या मजल्यावर वार्ड-ब चे कार्यालय असून, तळमजल्यावर वार्ड-इ कार्यालय स्थलांतरीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक १२.१०.०६ रोजी संपन्न झालेल्या प्रभाग समिती **ब** च्या सभेत झालेल्या सर्व स.सदस्यांचे (प्रभाग समिती **ब**) चर्चेनुसार इतर राज्यात महानगरपालिकेतर्फे कोणकोणत्या योजना राबविल्या जातात, औरंगाबाद मनपा व इतर राज्यातील मनपा यांचे कार्य कसे चालते? विविध विकास कामे कशा पध्दतीने केली जातात? तेथील समित्यांचे अधिकार व कर्तव्य याबाबत माहिती घेणेसाठी दिल्ली मनपा व या मनपा जवळच्या मार्गावरील सर्व महानगरपालिकांना भेट देणे व माहिती घेणेसाठी नवि दिल्ली येथे जाणेस (सर्व स.सदस्य प्रभाग समिती **ब**) व येणाऱ्या संभाव्य खर्चास परवानगी देणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.रजनीताई जोशी

अनुमोदक:श्री.सीताराम सुरे,श्री.मोहन भैय्या मेघावाले,श्री.दिलीप गायकवाड, श्री.महेश शिवाजी माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इतर राज्यात महानगरपालिकेतर्फे कोणकोणत्या योजना राबविल्या जातात, औरंगाबाद मनपा व इतर राज्यातील मनपा यांचे कार्य कसे चालते,विविध विकास कामे कशा पध्दतीने केली जातात, तेथील समित्यांचे अधिकार व कर्तव्य याबाबत माहिती घेणेसाठी दिल्ली मनपा व या मनपा जवळच्या मार्गावरील सर्व महानगरपालिकांना भेट देणे व माहिती घेणेसाठी नवि दिल्ली येथे जाणेस (सर्व स.सदस्य प्रभाग समिती **ब**) व येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नगर भूमापन क्र.१५३०६/१ अंदाजे क्षेत्रफळ १०००० चौ.मि. मंजुर विकास योजनेच्या आरक्षण क्रमांक २२९ उपविभागीय केंद्र (SDC) या आरक्षणाने मौजे गारखेडा येथील बाधीत जागेचे भूसंपादन करण्यात यावे व सदरील भूसंपादनासाठी लागणाऱ्या संपूर्ण खर्चासाठी मान्यता देण्यांत यावी.

आरक्षण क्र.२२९ उपविभागीय केंद्र मौज गारखेडा या आरक्षीत जागेचे रितसर भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवण्यात यावा. भूसंपादन खर्चास मान्यता व्हावी.

प्रस्तावाच्या मान्यतेनंतर पूढील वैधानिक कार्यवाही आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद तात्काळ सुरू करावी, या करीता स्वीकृतीसह मान्यता व्हावी. प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.मोहन मेघावाले

अनुमोदक:सौ.बोरामणीकर कला,श्री.पुरूषोत्तम ठाकुर,श्री.बाबासाहेब डांगे,श्री.रविंद्र गांगे,श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगर भूमापन क्र.१५३०६/१ अंदाजे क्षेत्रफळ १०००० चौ.मि. मंजुर विकास योजनेच्या आरक्षण क्रमांक २२९ उपविभागीय केंद्र (SDC) या आरक्षणाने मौजे गारखेडा येथील

बाधीत जागेचे भूसंपादन करण्यास व सदरील भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चास तसेच पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.८२ मधील भारतनगर येथे जलनिसा:रण वाहिनी टाकण्यासाठी अर्थसंकल्पात पान नं.डब्ल्यु १८४ वर १० लक्ष व पान नं.डब्ल्यु १८४ वर वॉर्ड क्र.८२ मध्ये अंतर्गत जलवाहीनी टाकणेसाठी ५ लक्ष अशी एकूण उक्त दोन्ही विकास कामासाठी १५ लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. तथापी अहिल्याबाई होळकर चौक ते तापडीया पार्क जवळील नाल्यापर्यंत असलेल्या नागरीकांच्या घरात पाणी शिरत असल्याने सांड पाण्याचा निचरा करण्यासाठी साईट गटार बांधणे आवश्यक आहे.

करीता उक्त कामाचे लेखाशिर्षक बदलून अहिल्याबाई होळकर चौक ते तापडीया पार्क जवळील नाल्यापर्यंत साईट गटार बांधण्यासाठी वळती करण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पार्वताबाई विजय वाघमारे

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.रविकांत गवळी, श्री.सतिष कटकटे, श्री.त्र्यबंक तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८२ साठी अर्थसंकल्पातील पान नं.डब्ल्यु १८४ वर असलेली तरतूद र.रू.१०.०० लक्ष व पान नं.डब्ल्यु १८४ वर असलेली र.रू.५.०० लक्ष अशी एकूण १५.०० लक्ष तरतूद **याऐवजी** अहिल्याबाई होळकर चौक ते तापडीया पार्क जवळील नाल्यापर्यंत साईट गटार बांधण्यासाठी वळती करणे व लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.८२ येथील अंतर्गत रस्ते खडीकरणासाठी अर्थसंकल्पात पा.न.डब्ल्यु १७५ रक्कम ५ लक्ष व अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी पा.न.डब्ल्यु १७८ रक्कम रू.५ लक्ष अशी एकूण १० लक्ष तरतूद उक्त दोन्ही विकास कामासाठी करण्यात आलेली आहे. तथापी या कामाऐवजी वार्ड क्र.८२ परिजातनगर एन-४ मधील उद्यान विकसीत करण्यासाठी एकूण १० लक्ष वळती करून लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पार्वताबाई विजय वाघमारे

अनुमोदक : श्री.दामोधर माधवराव शिंदे,श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.राजेश गुलाबचंद व्यास,
सौ.वीणा गजेंद्र सिध्द, सौ.पुष्पाताई बाळुनाना शिंदे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८२ साठी अर्थसंकल्पात पा.न.डब्ल्यु १७५ असलेली र.रू.५.०० लक्ष व पा.न.डब्ल्यु १७८ वर असलेली र.रू.५.०० लक्ष अशी एकूण र.रू.१०.०० लक्ष तरतूद **याऐवजी** वार्ड क्र.८२ परिजातनगर एन-४ मधील उद्यान विकसीत करण्यासाठी र.रू.१०.०० लक्ष वळती करून लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६७ मध्ये जलनिसारण वाहिनी टाकणे व ड्रेनेज लाईन दुरूस्ती करण्यासाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु १५८ अ.क्र.३ वर ५ लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. तथापी वार्ड क्र.१९ शिवनेरी कॉलनी येथील एन-९ आर-२६ रायगडनगर येथील उद्यान विकसीत करण्यासाठी वळती करण्यात यावी.

करीता वार्ड क्र.६७ मध्ये ठेवण्यात आलेली तरतूद ५ लक्ष वार्ड क्र.१९ मध्ये वळती करून उद्यान विकसीत करण्याच्या कामासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रविंद्र गांगे, श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल,श्री.बाबासाहेब डांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६७ मध्ये जलनिसारण वाहिनी टाकणे व ड्रेनेज लाईन दुरूस्ती करण्यासाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु १५८ अ.क्र.३ वर असलेली र.रू.५.०० लक्ष तरतूद वार्ड क्र.१९ शिवनेरी कॉलनी येथील एन-९ आर-२६ रायगडनगर येथील उद्यान विकसीत करण्यासाठी वळती करण्यास व लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६७ मधील खालील विकास कामासाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु १७६ वर तरतूद करण्यात आलेली आहे.

१. प्रभाग क्र.६७ अंतर्गत श्री.काळे यांच्या घरासमोरील त्रिमुर्ती चौकात फुटपाथ करणे - ३ लक्ष
२. प्रभाग क्र.६७ अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट ब्लॉक बसविणे बाबत - ३ लक्ष
३. प्रभाग क्र.६७ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ता करणे बाबत - ३.५ लक्ष
४. प्रभाग क्र.६७ शरद प्रोव्हीजन ते श्री.ढवलनपुरे यांच्या घरापर्यंत नविन पाईप लाईन टाकण्यासाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु १८४ वर - ३ लक्ष
५. प्रभाग क्र.६७ अंतर्गत नाथनगरमध्ये पाण्याची लाईन टाकणे पान क्र.डब्ल्यु १८४ वर - २ लक्ष

उक्त विकास कामाची वार्ड क्र.६७ मध्ये एकूण तरतूद १४.५ लक्ष असून याऐवजी वार्ड क्र.१९ शिवनेरी कॉलनी मधील पार्वती कन्या शाळेपासून ते एन-१० पर्यंत मोठ्या व्यासाची नविन ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी वळती करून सदर कामाची सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रविंद्र गांगे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील,श्री.संजय शिरसाट, श्री.अनिल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६७ मधील विविध कामासाठी प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ५ नुसार ठेवण्यात आलेली र.रू.१४.५ लक्षची तरतूद **याऐवजी** वार्ड क्र.१९ शिवनेरी कॉलनी मधील पार्वती कन्या शाळेपासून ते एन-१० पर्यंत मोठ्या व्यासाची नविन ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी वळती करण्यास व लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६९ मध्ये विकास काम करण्याकरीता सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे तरतुद करण्यात आली आहे, सदर तरतूदीतून सूचविल्याप्रमाणे काम करून लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यांत यावी.

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु १६०/६ | वार्ड क्र.६९ मध्ये भाजीमंडई व उद्यान विकसीत करणे | वार्ड क्र.६९ मध्ये अंतर्गत रस्त्यांचे पुन:र्डाबंरीकरण करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे. |

सुचक : श्रीमती डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर,सौ.सरला सखाराम पोळ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६९ मध्ये विकास कामाकरीता सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे असलेल्या तरतुदीचे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु १६०/६ | वार्ड क्र.६९ मध्ये भाजीमंडई व उद्यान विकसीत करणे | वार्ड क्र.६९ मध्ये अंतर्गत रस्त्यांचे पुन:र्डाबंरीकरण करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिका फंडातून नवीन वाहन खरेदीसाठी कर्ज वितरीत केले जाते. महानगरपालिकेने वितरीत केलेले वाहन कर्ज हे अधिकारी वर्गाना स्वत:चे वाहन खरेदी करण्यासाठी देण्यात आलेले आहे. संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेचे वाहन देण्यात आलेले नाहीत. सदरील वाहन कर्जातून खरेदी केलेल्या वाहनाचा उपयोग अधिकारी हे कार्यालयीन कामासाठी व वैयक्तिक कामासाठी सूध्दा करू शकतात. महानगरपालिका अधिकारी नोकरीत असतांना जर त्यांचे अचानक दु:खद निधन झाल्यास ज्याप्रमाणे शासन घर बांधणी कर्जासाठी आकारण्यात आलेल्या व्याजास माफी देते, त्याच धर्तीवर वाहन कर्जाच्या व्याजास सुध्दा माफी देणे आवश्यक वाटते. करीता विशेष बाब म्हणून मा.सर्वसाधारण सभेसमोर वाहन कर्जाच्या व्याज माफीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे,श्री.संतोष खेंडके,श्री.संजय शिरसाट

अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य,श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अधिकारी नोकरीत असतांना जर त्यांचे अचानक दु:खद निधन झाल्यास ज्याप्रमाणे शासन घर बांधणी कर्जासाठी आकारण्यात आलेल्या व्याजास माफी देते, त्याच धर्तीवर वाहन कर्जाच्या व्याजास माफी देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७४ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव ऐनवेळी सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु १८५/५ | नविन डांबरी रस्ते<br>वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी मधील संघर्षनगर सिडकोच्या ११ व्या योजना सर्व मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते दुरूस्ती व डांबरीकरण करणे-३ लक्ष | नविन डांबरी रस्ते<br>वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी मधील संघर्षनगर सिडकोच्या ११ व्या योजना सर्व मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते दुरूस्ती व कॉंक्रेटींग करणे-२.५ लक्ष |
| | डब्ल्यु १८५/५ | नविन डांबरी रस्ते<br>वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी मधील संघर्षनगर सिडकोच्या ११ व्या योजना सर्व मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते दुरूस्ती व डांबरीकरण करणे-३ लक्ष | नविन डांबरी रस्ते<br>वार्ड क्र.७४ संघर्षनगर ११ व्या योजना सिडकोतील ओपन स्पेसमध्ये पी.ओ.सी.ब्लॉक बसविणे-५० हजार |
| २ | डब्ल्यु १८६/१ | भांडवली कामे व जलनिसारण<br>वार्ड क्र.७४ येथील सिडको कम्युनिस्ट हॉलच्या बाजूला खूल्या जागेवर संरक्षण भिंत बांधून सुशोभिकरण करणे-२ लक्ष | भांडवली कामे व जलनिसारण<br>वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी संघर्षनगर ११ व्या योजना सिडको येथील श्री.बत्तासे यांच्या घराशेजारी ओपन स्पेसला कंपाऊड वॉल बांधून सुशोभिकरण करणे-२ लक्ष |
| ३ | डब्ल्यु १८६/२ | नविन कॉंक्रीट रस्ते<br>वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनीमध्ये पोलिस | नविन कॉंक्रीट रस्ते<br>वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनीतील संघर्षनगर सिडको ११ व्या योजना ए-सेक्टर मध्ये |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्टेशनच्या बाजूच्या खूल्या जागेवर संरक्षण भिंत बांधून सुशोभिकरण करणे (गौतम बुध्दाच्या पुतळ्याची नियोजीत जागा)- ३ लक्ष | अर्धगोलाकार गटार बांधणे- २.५ लक्ष |

सुचक : श्री.बन्सीलाल तुळशीराम गांगवे (मामा) अनुमोदक : श्री.दामोधर माधवराव शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७४ मधील प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ नुसार विविध विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.५७ मधील अर्थसंकल्पात विकास कामासाठी केलेल्या तरतूदीचे खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्षक बदलणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ. क्र. | अर्थसंकल्पातील पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डब्ल्यु १७७ | वार्ड क्र.५७ मध्ये विविध रस्त्याचे डांबरीकरण व दुरूस्ती-५ लक्ष | वार्ड क्र.५७ मधील खडी रस्ते, गटार दुरूस्ती, कॉंक्रेटींग, फरशी दुरूस्ती,खांडकी दुरूस्ती, ड्रेनेज लाईन दुरूस्ती व इतर किरकोळ कामे - ५ लक्ष |
| २ | डब्ल्यु १३/५७ | १. प्रभाग क्र.५७ दत्तनगर, भवानीनगर रस्त्याचे पॅचवर्क करणे-५ लक्ष<br>२. प्रभाग क्र.५७ दत्तनगर, भवानीनगर अंतर्गत रस्त्याचे पॅचवर्क करणे-५ लक्ष | प्रभाग क्र.५७ मधील कार्यालय (क) जाफरगेट येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे-१० लक्ष |
| ३ | डब्ल्यु १५८ | वॉर्ड क्र.५७ विविध ठिकाणी जलनि:सारण वाहीनी व मेनहोल दुरूस्ती करणे व माती उचलणे-१० लक्ष तरतूद करण्यातआली होती, या कामाचे वार्ड क्र.५७ मध्ये ड्रेनेज लाईनसाठी ९ लक्ष अंदाजपत्रक तयार असून उर्वरीत १ लक्ष समोर दर्शविलेल्या कामात वळती करावे. | वॉर्ड क्र.५७ तक्षशिलनगर (स्लम) येथे दोन हात पंप बसविणे-१ लक्ष. |

सुचक : श्री.त्र्यंबक तुपे अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५७ मधील प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ नुसार विविध विकास कामाचे लेखाशिर्षक बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक १९.०६.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.२७७/५ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यांत यावी.

प्रभाग क्र.९४ जालाननगर भागात पथदिव्यांची व्यवस्था करणे- र.रू.१०.०० लक्ष

**याऐवजी**

प्रभाग क्र.९४ अंतर्गत विविध ठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे-र.रू.१०.०० लक्ष

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.अल्पा विकास जैन — अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १९.०६.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.२७७/५ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

प्रभाग क्र.९४ जालाननगर भागात पथदिव्यांची व्यवस्था करणे- र.रू.१०.०० लक्ष

**याऐवजी**

प्रभाग क्र.९४ अंतर्गत विविध ठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे-र.रू.१०.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये वॉर्ड क्र.०४ साठी पान क्र.१६९ वर भांडवली कामे जलनिस्सारण वाहीनी टाकणे र.रू.१० लाख.

**याऐवजी**

होनाजीनगर जटवाडा रोड येथे उर्वरीत पाणी पूरवठा करण्यासाठी १५० एम.एम. व्यासाची पाईप लाईन टाकणे यासाठी र.रू.३ लाख वळती करण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रविकांत गवळी — अनुमोदक : श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये वॉर्ड क्र.०४ साठी पान क्र.१६९ वर भांडवली कामे जलनिस्सारण वाहीनी टाकणे र.रू.१०.०० लाख असलेली तरतूद **याऐवजी** होनाजीनगर जटवाडा रोड येथे उर्वरीत पाणी पूरवठा करण्यासाठी १५० एम.एम. व्यासाची पाईप लाईन टाकणेसाठी र.रू.३.०० लाख वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहागंज चमन ते दर्गा निझामोद्दीन एम.एस.ई.बी. ऑफीस पर्यंत येथे मिना बाजार भरविण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.९१/३ दि.१९.१०.२००५ अन्वये ना नफा ना तोटा या तत्वावर रूपये २५,०००/- झालेल्या खर्चाच्या आकारणी करून आणि संयोजन समितीने महानगरपालिकेच्या अटी व शर्ती नुसार करारनामा करून देणे यावर मान्यता दिलेली होती.

दरवर्षी शहागंज चमन ते दर्गा निझामोद्दीन एम.एस.ई.बी.ऑफीस पर्यंत मिना बाजार भरविण्यात येतो हा बाजार सार्वजनिक स्वरूपाचा असून भारतीय राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक आहे. या बाजाराचा फायदा सर्व जनतेला होतो. या सर्व बाबी विचारात घेऊन मिना बाजार भरविण्यासाठी प्रत्यक्षात येणारा खर्च जसे रस्ते दुरूस्ती इत्यादी करीता रूपये २५,०००/- आकारणी करून ना नफा ना तोटा या तत्वावर मिना बाजार असोसिएशन संयोजन समितीने महानगरपालिकेच्या अटी व शर्ती नुसार करारनामा करून देणे यासह यावर्षी रू.२५,०००/- इतकी रक्कम रस्ते देखभाल दुरूस्तीसाठी येणारा खर्च आकारणी करून मिना बाजार असोसिएशन या अनुभवी संस्थांना यावर्षी देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.नासेर मो.नाहदी चाऊस — अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिना बाजार भरविण्यासाठी प्रत्यक्षात येणारा खर्च जसे रस्ते दुरूस्ती इत्यादी करीता रूपये २५,०००/- आकारणी करून ना नफा ना तोटा या तत्वावर मिना बाजार असोसिएशन संयोजन समितीने महानगरपालिकेच्या अटी व शर्ती नुसार करारनामा करून देणे, यासह

यावर्षी रू.२५,०००/- इतकी रक्कम रस्ते देखभाल दुरूस्तीसाठी येणारा खर्च आकारणी करून मिना बाजार असोसिएशन या अनुभवी संस्थांना यावर्षी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये पान क्र.डब्ल्यु ७६ पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती अंतर्गत अ.क्र.१७ कैसर कॉलनी मिना मस्जीद परिसरातील जलवाहीन्या बदलणेसाठी रू.३ लक्ष ची तरतूद ठेवण्यात आली होती, त्यापैकी सदर काम २.५ लक्ष रू.मध्ये होत आहे, करीता ५० हजार शिल्लक रक्कम राहात आहे, ही रक्कम आपण वॉर्ड क अंतर्गत फुटकळ जलनिस्सारणाच्या कामासाठी वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी जलनिस्सारण दुरूस्ती फुटकळ कामे र.रू.५० हजार या कामासाठी वळती करणेस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सलीम पटेल अनुमोदक : श्री.कैसर खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये पान क्र.डब्ल्यु ७६ पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती अंतर्गत अ.क्र.१७ कैसर कॉलनी मिना मस्जीद परिसरातील जलवाहीन्या बदलणेसाठीच्या उर्वरीत र.रू.५०.०० हजार, वॉर्ड क अंतर्गत फुटकळ जलनिस्सारणाच्या कामासाठी वार्ड क्र.५५ कैसर कॉलनी जलनिस्सारण दुरूस्ती फुटकळ कामे र.रू.५० हजार या कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.६,बेगमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-९२ | **जलनि:सारण देखभाल दुरूस्ती** वार्ड क्र.६ अंतर्गत विविध वसाहतीमधील गटारीची दुरूस्ती करणे व ढापे टाकणे-२.०० | १. वार्ड क्र.६ मध्ये दत्तनगर विद्युत कॉलनी येथे बॉस्केट बॉलचे ग्राऊंडचे उर्वरीत काम करणे-२.०० लक्ष |

सुचक : श्री.विनायक पांडे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.६,बेगमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु-९२ | **जलनि:सारण देखभाल दुरूस्ती** वार्ड क्र.६ अंतर्गत विविध वसाहतीमधील गटारीची दुरूस्ती करणे व ढापे टाकणे-२.०० | १. वार्ड क्र.६ मध्ये दत्तनगर विद्युत कॉलनी येथे बॉस्केट बॉलचे ग्राऊंडचे उर्वरीत काम करणे-२.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : पुंडलिकनगरला दिपावलीच्या अगोदर पाणी देणार वृत्तपत्रात आलेले आहे. पुडंलिकनगरला पाणी देण्या बाबतचा लढा हा सर्व नागरीकाचा आहे.शासनाने या महानगरपालिकेला भरपूर आर्थिक मदत केलेली आहे. ज्यावेळी पाणी देण्या बाबतचा उद्घाटनाचा कार्यक्रम घेणार आहात त्यावेळी राष्ट्रवादी कॉग्रेस तसेच भारतीय राष्ट्रवादी कॉग्रेसचे एक एक पाहुने आमंत्रित करावे अशी विनंती आहे.

श्री. संजय सिरसाट : चांगली सुचना केली आहे. मा. मुख्यमंत्री विलासराव देखमुख तसेच या शहराचे आमदार मा. श्री. दर्डा साहेब यांना बोलविण्यात यावे.

श्री. भाऊसाहेब ताठे : पुंडलिकनगर भागास पाणी देण्यास हरकत नाही परंतू त्या कालावधीत सिडको हडको भागातील पाणी पूरवठा विस्कळीत होणार नाही याची दखल घेण्यात यावी.

मा. महापौर : ही तांत्रिक बाब आहे यावर प्रशासन विचार करील. क्रॉस कनेक्शनसाठी एक दिवस पाणीपूरवठा खंडीत होणारच आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : तांत्रिक अडचणी काय येणार आहे हे आपल्याला माहित आहे, का संबधीत अधिकारी येथे उपस्थित नाही. ३ दिवस पाणीपूरवठा येणार नाही जाहीर केलेले आहे त्यामूळे अधिकारी हवालदिल झाले आहे अशी परीस्थिती आहे का, याचा खूलासा घेण्यात यावा. फेब्रुवारी पासून काय कामे केले याचा खूलासा करावा. जी परीस्थिती अगोदर होती तीच आज आहे नवीन काही केले आहे का नसता महान नेत्याच्या हस्ते उद्घाटन होणार व पाणी दिले जाणार नाही अशी परीस्थिती होणार असेल तर योग्य नाही. खुलासा घेण्यात यावा.

मा. महापौर : दिपावलीच्या अगोदर पुंडलिकनगर भागास पाणी देणार आहोत. एक दिवस पाणी पूरवठा बंद राहणार आहे.त्या बध्दल दिलगिरी व्यक्त करतो. फारोळा येथील जे काम करायचे आहे ते दिपावली,रमजान ईद नंतर हाती घेणार आहोत.

या बरोबरच ''राष्ट्रगिताने ''सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.